**सुविचार**

ज्याच्या जीवनामध्ये निश्चित धेय्य नसते, त्यालाच वेळ घालवण्यासाठी साधन शोधण्याची गरज असते.

साप्ताहिक

# अधिकारनामा

Email : adhikarnama2021@ gmail.com

Web : www.adhikarnama.in

'अधिकारनामा' या साप्ताहिक साठी जिल्हा आणि तालुका प्रतिनिधी नियुक्त करायचे आहेत. इच्छुकांनी संपर्क करावा. मो. 9665382780, 9766382780

मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८०

कार्यालय : साप्ताहिक अधिकारनामा, गाडगे नगर, अमरावती – ४४४६०३

अकोला * बुधवार दि. २० जुलै २०२२ * वर्ष २ रे * अंक १६ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842


## एकच काम करा, नोंदणी, नोंदणी, नोंदणी,

## ५० लाख प्रतिज्ञापत्रांचा टप्पा पार करा




**साप्ता. अधिकारनामा**

**मुंबई** : शिंदे गटात कार्यकर्त्यांची संख्या वाढत असल्याने उद्धव ठाकरे यांची डोकेदुखी वाढली आहे. आज रामदास कदम यांनी जाहीररित्या आम्ही बंड का केलं हे सांगितलं. त्यावर उद्धव ठाकरे यांनी जोरदार टोला लगावला. कोण काय करतंय कोण रडतंय त्याकडे लक्ष देऊ नका. तुम्ही आपल्या पक्षासाठी फक्त नोंदणी वाढवा असा संदेश दिला. त्यानंतर "पण जेव्हा भाजपला कळेल हे काडीच्या कामाचे नाही तेव्हा भाजप त्यांना फेकून देईन. तुम्हाला एकच काम देतोय. नोंदणी नोंदणी आणि नोंदणी. याच्यापलिकडे तुम्ही काही पाहू नका. राजकारणात कोण काय बोलतंय त्याकडे लक्ष देऊ नका. तुम्हाला जे काम दिलं ते आठ दिवसात पूर्ण करा. जनतेच्या मनात आपल्याबद्दल प्रेम सहानुभूती आहे. तीव्र राग आहे. त्याचा शिवसेना वाढीसाठी उपयोग करा. ही आलेली संधी आहे. एकदा आपण ५० लाखाचा टप्पा पार केला तर नोंदणीचे गठ्ठेचे गठ्ठे घेऊन या. त्यानंतर प्रत्येक जिल्ह्याती मी दौरे करणार आहे. गटप्रमुख आणि शाखाप्रमुखांसोबत घेऊन काम करा असा आदेश उद्धव ठाकरेंनी दिला. "ते एवढे सुडाने पेटले आहेत की शिवसेना संपलीच पाहिजे या भाजपच्या डावाला बळी पडून ते आपल्या मुळावर घाव घालत आहेत. मला त्यांनी मागितलं असतं तर मी दिलं असतं. माझा स्वभाव तुम्हाला माहीत आहे. जो बाळासाहेबांचाही होता. मागितलं तर मी काहीही देईन. पण हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला तर मात्र, त्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. त्या ईर्षेने आणि जिद्दीने मी उभा राहिलो आहे. ही इर्षा केवळ आणि केवळ तुमच्या भरवश्यावर आहे. तुम्ही सोबत असल्यास मला कशाचीही पर्वा नाही. समोर भाजप असू दे की हे गद्दार नामर्द असू दे. मला त्यांची पर्वा नाही. ते काही काळ सत्ता उपभोगतील असंही ठाकरे यांनी सांगितलं.

त्यांनी निवडणुकीला सामोरे जावं आणि मतं मिळवावं. पण ही हिंमत यांच्यात नाही. कारण हे खरे मर्दच नाहीत. दुसऱ्यांचा पक्ष चोरणं, दुसऱ्याचं चिन्हं चोरण्याचा प्रयत्न करणं ते चोरलं जाऊच शकत नाहीत. दुसऱ्याच्या पक्षाचं नाव चोरणं ते चोरलं जाऊच शकत नाही. याला हिंमत लागते, हे चोरांचं काम आहे. आता जे काही चाललं आहे. त्या चोराच्या उलट्या बोंबा आहेत. या बोंबांना यांना बोंबलायचं तर बोंबलू द्या. काही दिवस हा खेळ चालेल. पण तोपर्यंत आज सुद्धा सांगतो. तुम्ही निष्ठेने सोबत आहात. तसं पाहिलं तर आमदार आणि खासदारांना मी सुद्धा डांबून ठेवू शकलो असतो. त्याला लोकशाही नाही म्हणत. तुम्ही मनाने गेले असाल तर मी किती दिवस तुम्हाला कोंडू शकतो. त्या गोष्टीवर माझा विश्वास नाहीये. मी आजही कार्यकर्त्यांना भेटलो. त्यांनाही सांगितलं ज्यांना जायचं त्यांनी जरूर जा नाटकं करू नका. उगाचच टीव्ही समोर जाऊन रडण्याचं ढोंग करू नका.

## फोन टॅपिंगप्रकरण भोवलं, माजी पोलीस

## आयुक्त संजय पांडे यांना ईडीकडून अटक



**साप्ता. अधिकारनामा**

**मुंबई** : बेकायदेशीरपणे फोन टॅपिंग प्रकरणी माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांना ईडीकडून अटक करण्यात आली आहे. अनेक प्रकरणांमध्ये त्यांना आरोपी करण्यात आले आहे. संजय पांडे यांची सकाळपासून ईडीकडून चौकशी सुरु होती. या चौकशीनंतर पांडे यांना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याशी संबंधित १०० कोटींच्या वसुलीच्या संदर्भात सीबीआयने पांडे यांची चौकशी केली. तर एनएसई कंपनी घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात ईडीने त्यांची चौकशी केली. सोमवारी सीबीआयने प्रथम पांडे यांची चौकशी केली. संजय पांडे यांनी २००१ मध्ये पोलीस सेवेचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी आयटी ऑडिट फर्मची स्थापना केली, त्यानंतर त्यांचा राजीनामा स्वीकारला गेला नाही. तेव्हा ते पोलिस सेवेत परतले आणि त्यांच्या मुलाला आणि आईला फर्ममध्ये संचालक केले. २०१० ते २०१५ दरम्यान, Isec Services Pvt Ltd नावाच्या फर्मला NSE सव्हर आणि सिस्टमसाठी कंत्राट देण्यात आले होते. यापूर्वी सीबीआयने या प्रकरणाचा तपास केला होता आणि आता ईडी तपास करत आहे.

निवृत्त आयपीएस अधिकारी संजय पांडे हे मुंबई पोलिस आयुक्त पदावर येण्याआधी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकपद सांभाळत होते. एप्रिल २०२१ मध्ये उद्धव ठाकरे सरकारने त्यांना महाराष्ट्राच्या DGP पदाची जबाबदारी दिली. मात्र, आयपीएस रजनीश सेठ यांची महाराष्ट्राच्या डीजीपीपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्याकडून पदभार काढून घेण्यात आला. १९८६ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी हे मुंबई पोलिसांचे ७६ वे पोलिस आयुक्त होते. आयपीएस हेमंत नगराळे यांच्याकडून त्यांनी आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारली. पांडे नुकतेच ३० जून रोजी निवृत्त झाले.

## अवैध सावकारी प्रकरणातील आरोपींना अटक

## न्यायालयाने सुनावली एक दिवसाची पोलिस कस्टडी




**साप्ता. अधिकारनामा**

**शिरपुर** : शिरपुरच्या अवैध सावकारी प्रकरणातील २३ आरोपी सुमारे १ महिन्यांपासून फरार होते. त्यापैकी फक्त ३ आरोपींना दि.१८ जुलै रोजी शिरपुर शहर पोलिसांनी अटक केली होती. आज मंगळवारी दुपारी शिरपुर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किरणकुमार बाऱ्हे यांनी न्यायालयांत सदर घडलेला गुन्हा गंभीर स्वरुपाचा असून गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी आरोपींना तीन दिवसांकरिता पोलिस कोठडी मिळावी अशी मागणी केली होती.

तसेच आरोपींची कसून चौकशी करून, त्यांची साखळी उजेडात आणणे, झाडाझडती घेणे, आवश्यक दस्तऐवज व इतर वस्तू हस्तगत करणे अद्याप बाकी आहे. करिता पोलिस कस्टडीची मागणी केली. शिरपुर मॅजिस्ट्रेट कोर्टात आज दिनांक १९ जुलैला आरोपींना हजर केले होते. न्यायालयात सरकार पक्षातर्फे तपासी अधिकारी किरणकुमार बाऱ्हे आणि सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. श्री. अवधूत भावसार यांनी बाजू मांडली आणि तीन दिवसांकरिता पोलिस कस्टडी मागितली. त्यावर न्यायाधीश भद्रे यांनी आरोपींना आज एक दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली. सदरहू अवैध सावकारी प्रकरणातील २० आरोपी अद्यापही फरारंच आहेत. सदरहू प्रकरणांत शिरपुरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी किरणकुमार बाऱ्हे यांनी फरार आरोपींना अटकेसाठी विशेष पथक तयार केले असून, आरोपींना लवकरात लवकर अटकेसाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले आहे.

## मंत्रालयात पाण्याची बाटली घेऊन जाण्यास बंदी,

## गृह विभागाने घेतला निर्णय



**साप्ता. अधिकारनामा**

**मुंबई** : मंत्रालयात कधी कधी काम न झाल्यामुळे नागरिक हताश होऊ पाण्याच्या बाटलीमधून कीटकनाशक प्राशन करण्याचा किंवा रॉकेल अंगावर ओतून घेण्याचा प्रयत्न करतात. असे प्रकार रोखण्यासाठी गृह विभागाने एक निणर्य घेतला आहे. आता पाण्याच्या बाटल्या आणण्यावर बंदी घालण्यात आली आहे. मंत्रालयात सर्व सामान्य नागरिकांना आकाशवाणी समोरच्या प्रवेशद्वाराजवळूनच प्रवेश देण्यात येत आहे. हा प्रवेश देताना पोलिसांकडून सर्वांची कसून तपासणी करण्यात येत आहे. संबंधित नागरिकांकडे आवश्यक ते ओळखपत्र आणि गेट पास असल्याशिवाय प्रवेश दिला जात नाही. त्याचवेळी पोलिसांकडून सध्या पिण्याच्या पाण्याची बाटली घेऊन जाण्यास मनाई केली जात आहे. त्यामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडत असल्याचे दिसून येत आहे.

आतापर्यंत मंत्रालयात प्रवेश करताना सामान्य नागरिकांच्या खिशात तंबाखू व गुटख्याच्या पुड्या आहेत का याचाही शोध घेतला जात होता. आता पाण्याच्या बाटलांचाही शोध पोलिसांनी सुरू केला असून पाण्याच्या बाटल्या असल्यास प्रवेशद्वाराजवळ काढून ठेवल्या जात आहेत. काही दिवसांपूर्वी मंत्रालयात येऊन विषप्राशन करण्याचा प्रयत्न झाला होता. त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून गृह विभागाने पाण्याच्या बाटल्यांवर बंदी घातली आहे. मंत्रालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांमध्ये याविरोधात तीव्र नाराजी उमटत आहे.

## शिंदे सरकारचा मोठा निर्णय,महामंडळा वरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीही रद्द



**साप्ता. अधिकारनामा**

**मुंबई** : महाविकास आघाडी सरकारच्या काळात १ एप्रिल २०२२ पासून जिल्हा वार्षिक योजना, राज्यस्तरीय योजना, आदिवासी विकास उपयोजना तसेच विशेष घटक व अन्य योजनांमध्ये मंजूर झालेल्या पण निविदा न काढलेल्या कामांच्या अंमलबजावणीस शिंदे सरकारने स्थगिती दिली आहे. त्याचसोबत विविध महामंडळावरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्याही रद्द करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडी सरकारने घेतलेल्या अनेक कामांना स्थगिती देण्याचा सपाटा लावला आहे. याबाबत सोमवारीच विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने विकासकामांना स्थगिती देऊ नये अशी मागणी केली होती.

विरोधी पक्षाच्या या मागणीनंतरही शिंदे सरकारने जिल्हा वार्षिक योजना, राज्यस्तरीय योजना, आदिवासी विकास उपयोजना, विशेष घटक योजनेतील मंजूर झालेली व निविदा स्तरावर असलेल्या सर्व योजनांच्या कामांना सोमवारी एक आदेश काढून स्थगिती दिली. यासोबतच प्रशासकीय विभागाच्या अंतर्गत असणारे उपक्रम, महामंडळ, मंडळ, समित्या, प्राधिकरणे यावर नियुक्त करण्यात आलेल्या सर्व अशासकीय सदस्य यांच्या नियुक्त्या रद्द करण्याचे आदेशही काढण्यात आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार या योजनांना स्थगिती देण्यात येत असल्याचे राज्याचे मुख्य सचिव मनूकुमार श्रीवास्तव यांनी आदेशात नमूद केले असून मंत्रालयातील सर्व खात्याच्या सचिवांना तसे कळविले आहे.

## युवा सेनेचे सचिव वरुण सरदेसाईची हकालपट्टी

**साप्ता. अधिकारनामा**

**मुंबई** : शिवसेना युवा सेनेचे सचिव वरुण सरदेसाई देसाई याची एकनाथ शिंदे यांनी पदावरून हकालपट्टी केली आहे. त्याच्या ऐवजी शिंदे गटातील किरण साळी याची युवासेनेच्या राज्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. वरुण सरदेसाई हा आदित्य ठाकरेंचा मावसभाऊ आहे. विधानपरिषद आणि राज्यसभेच्या निवडणुकीत शिवसेनेच्या सर्व कामकाजात वरुण सरदेसाईने महत्त्वाची भूमिका राबवली होती. त्याच्यावर एकनाथ शिंदेंनी आरोप केले होते. आक्रमकपणे आंदोलन असो की, महाराष्ट्रभर युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या भेटी, आदित्य ठाकरेनंतर युवासेनेचा चेहरा म्हणून त्याच्याकडे पाहिल्या जात होते. मात्र त्याच्या हकालपट्टीने एकप्रकारे आदित्य ठाकरेंनाच शिंदे गटाकडून आव्हान देण्यात आल्याची चर्चा सुरू आहे.

उद्धव ठाकरेंनी बंडखोरांवर कारवाई करत त्यांची पक्षातून हकालपट्टी सुरू केली आहे. गेली अनेक दिवस बंडखोरांची शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली अशा बातम्या पक्षाच्या मुख्यपत्रातून देण्यात येत आहेत. यात किरण साळी, राजेंद्र जंजाळ यांची युवासेनेतून हकालपट्टी करण्यात आली, तर शिवसेनेतून आमदार संतोष बांगर, आमदार सुहास कांदे यांच्यावर शिवसेनेविरोधात काम केल्याचा आरोप करत त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. युवासेनेच्या अध्यक्ष पदासाठी वरुण सरदेसाई यांचे नाव चर्चेत होते. आदित्य ठाकरेंवर मंत्रिमंडळाची जबाबदारी असताना त्यांना महाराष्ट्रभर युवासेनेचे जाळे तयार करणे किंवा अनेक युवासेनेच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे शक्य होत नव्हते. यावेळी त्यांच्यावर युवासेनेच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्याचा माणस होता. मात्र, त्यांना पक्षातून असलेल्या विरोधामुळे ही नियुक्ती झाली नव्हती. मात्र ठाकरे कुटुंबियाबाहेरील व्यक्तिचा शिवसेनेत आणि युवासेनेत वाढणारा दबदबा यामुळे त्यांना मोठा विरोध होत होता.

## खसाळा येथील राख तलाव फुटला,

## आमदार चंद्रशेखर बावनकुळेंनी केली पाहणी



**साप्ता. अधिकारनामा**

**नागपूर** : कोराडी औष्णिक वीज प्रकल्पातील राख साठविण्यासाठी असणारा खसाळा तलावात अचानक फुटला. यामुळे लगतच्या खसाळा, मसाळा, कवठा, खैरी येथील शेत शिवारात राखमिश्रित पाणी शिरले आहे. या घटनेमुळे शेतीचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी संकटात सापडला आहे. घटनेची माहिती मिळताच आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी गावात जाऊन परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. नुकसानग्रस्तांना महाजनकोकडून लवकरात लवकर मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. वीजप्रकल्पात जाळण्यात येणाऱ्या कोळशाची राख राख तलावात साठविला जातो. कोराडीतील राख खसाळा तलावात साठविली जाते. गेल्या काही दिवसांपासून या भागात पाण्याचा कहर सुरू होता. त्यातच शनिवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास उप्पलवाडी भागातून तलावाचा बांध फुटला. पाणी उताराच्या दीशेने धावून लागले.

पाण्याचा ओघ नाल्यातून व वस्त्यांकडे येताना दिसताच आरडाओरड सुरू झाली. दुपारी १ च्या सुमारास सर्वदूर ही माहिती पोहोचली. ग्रामस्थांनी गर्दी केली. खैरी नाल्याला पूर आला आहे. नाल्यावरील पूल पाण्याखाली गेल्याने ग्रामस्थ गावातच अडकून पडले आहेत. पाण्याचा विसर्ग कधीपर्यंत सुरू राहिल याची कोणतीही कल्पना नसल्याने ग्रामस्थ चिंतेत आहेत. छिंदवाडा रेल्वे ट्रॅकही पाण्याखाली गेला आहे. पाण्याचा प्रवाह फार अधिक असल्याने सर्वत्र पाणीच पाणी दिसून येत आहे. घातक राख नदी नाल्यांच्या पाण्यात मिसळून गावांचे पेयजल दूषित होण्याचा धोका वाढला आहे. घटनेची माहिती मिळताच महानिर्मितीचे अधिकारी, तहसीलदार कार्यालयातील पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेची माहिती मिळताच आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनीही गावात जाऊन परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. नुकसानग्रस्तांना महाजनको कडून लवकरात लवकर मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

## नुकसानग्रस्त पीकांचे सरसकट पंचनामे करा

### आमदार रमेश कराड यांची मागणी



**साप्ता. अधिकारनामा**

**लातूर** : जिल्ह्यात गोगलगाईच्या प्रादुर्भावामुळे आणि सततच्या पावसामुळे नुकसानीत आलेल्या रब्बी हंगामातील पिकाचे सरसकट पंचनामे करून शेतक्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष आ. रमेश कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. लातूर जिल्हयात यावर्षी समाधानकारक पाऊस होत असून, खरीपाच्या पीकांची उगवण चांगली होत आहे; मात्र, गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे, असे सांगून आ. रमेश कराड म्हणाले की, गोगलगाय ही एक बहुभक्षी किड आहे. पिकांचे रात्रीच्या वेळी सक्रीय राहून मोठ्या प्रमाणात नुकसान करते. या गोगलगायीमुळे सोयाबीनसह खरीपांच्या इतरही पीकांचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

गोगलगायीचा दिवसेंदिवस प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे जिल्हाभरात अनेक ठिकाणी गोगलगायीने सोयाबीनसह इतर पीकेही नष्ट केली आहेत. त्याचबरोबर सततच्या पावसामुळे पिके पिवळी पडत आहेत, त्यांची वाढ खुंटली असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. त्यामुळे सोयाबीनसह खरीपाच्या पिकांचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करून दिलासा द्यावा, अशी मागणी आमदार कराड यांनी केली आहे.

संपादकीय

# हुकूमशहाची दुसरी बाजू

जोसेफ स्टालिन हे 'सोव्हिएत रशियाचे संघराज्य या देशाच्या इतिहासातील महत्त्वाचे नाव. १९२२ ते १९५३ दरम्यान साम्यवादी रशिया स्टालिनच्या आधिपत्याखाली होता. यापैकी बराच काळ भारत पारतंत्र्यात होता. त्यामुळे भारतीय प्रसारमाध्यमांच्या मजकुराचे धोरण इंग्रज राजवट ठरवत होती. ब्रिटिशांचे धोरण टोकाचे स्टालिनविरोधी राहिल्यामुळे भारत सरकारची (ब्रिटिश इंडिया) प्रसारमाध्यमे स्टालिनबद्दल चांगले काही न लिहिता वाईट तेवढ्या गोष्टींवरच भर देत असत. त्यामुळेच की काय, स्टालिनची दुसरी बाजू भारतीय जनमानत कधी उतरलीच नाही. उलट कम्युनिस्टांविषयी ब्रिटिशांचा एकतर्फी तिरस्कार भारतीय प्रसारमाध्यमांत व जनमानसात ठळकपणे दिसतो. स्टालिन जर इतका नराधम, गुन्हेगारी, नीच वृत्तीचा असता तर तो ३० वर्षे सत्तेत राहू शकला नसता. रशियन युवक-युवतींच्या लोकप्रियतेच्या गुणांकनामध्ये याचे अनेक वर्षे पहिल्या क्रमांकावर झार निकोलाय (दुसरा) विराजमान होता. परंतु गेल्या दशकापासून ती जागा स्टालिनने घेतली आहे. हे शक्य झाले त्याला काही सबळ कारणे असतील. स्टालिनकडे पुन्हा नव्या नजरेने पाहात, या गोष्टीचा विचार व्हायला हवा. त्यातील एक गोष्ट म्हणजे, स्टालिनचे महाकाय ग्रंथालय. या ग्रंथालयात रोज तीन ते चार तास वाचन, मनन, लेखन आणि नोंदी करण्याची सवय त्याला होती. तो रोज ३०० ते ५०० पाने वाचायचा. तसेच त्यातील महत्त्वाच्या मजकुराला लाल, निळ्या व हिरव्या पेन्सिलने वेगवेगळ्या खुणा करून ठेवायचा. मग त्याविषयी जाणकारांशी, अर्थतज्ज्ञांशी, प्रकाशकांशी, लेखकांशी व विचारवंतांशी चर्चा करायचा. अन्यथा स्टालिनला लिऑन ट्रॉटस्कीसारख्या प्रखर बुद्धिमान विचारवंताशी वैचारिक लढा देऊन त्याला पराभूत करणे अशक्य होते. स्टालिन अभिमानाने 'द एडिटर ऑफ यूएसएसआर' असे बिरुद मिरवीत असे. त्याच्या अभ्यासानुसार त्याला जर आपल्या स्वतःच्या प्रस्थापित विचारसरणीशी तडजोड करावी लागली, तरी तो ती करत असे. स्वतः प्रखर मार्क्सवादी असूनही समाजवादी वर्णसंघर्षांवर त्याचे मार्क्सच्या विचारांशी जुळले नाही. तेव्हा त्याने त्यावर तोडगा सुचवून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. स्टालिन नसता तर दुसऱ्या महायुद्धाच्या विजयानंतर चर्चिल-रूझवेल्ट जोडीने रशियाचा, पूर्व युरोपचा मोठा लचका तोडला असता. चर्चिलने दुसऱ्या महायुद्धानंतर वाटण्याची चर्चा करताना रूझवेल्टला असे सांगितले होते की, 'तू आणि मी आपण भविष्यातील दशकांचा अभ्यास करतोय तर हा स्टालिन पुढील शतकांचा विचार करतोय, तेव्हा त्याच्याशी चर्चा करताना अतिशय सावध राहिले पाहिजे.'

जगाच्या अलीकडच्या इतिहासात रक्तरंजित क्रांती आणणारा क्रूरकर्मा हुकूमशहा म्हणून ज्याची एकतर्फी ओळख आहे, अशा जोसेफ स्टालिनचे विचारवंत आणि अभ्यासक म्हणून वर्णन करणाऱ्या जेफ्री रॉबर्टच्या 'स्टालिन्स लायब्ररी – अ डिक्टेटर अ‍ॅण्ड हिज बुक्स' या पुस्तकात, रशियाचा एक विद्वान, संवेदनशील, अभ्यासू नेता आपल्याला भेटतो. नुकत्याच प्रकाशित झालेल्या या पुस्तकात स्टालिनविषयी असे म्हटले आहे की, तो प्रज्ञावंत, आदर्श अनुशासक (स्टेट्समन) होता. त्याला इतिहास, मार्क्सवाद तसेच लिऑन ट्रॉटस्कीचे विचार वाचण्याची आवड होती. स्टालिनने ना कधी डायरी लिहिली, ना आठवणी. तो स्वतःच्या व्यक्तिगत जीवनाविषयीही कायम गप्प राहिला. इतिहास हा त्याचा सर्वाधिक आवडता विषय, अर्थात मार्क्सवादाचा त्याने सखोल अभ्यास केला होता. लेनिन हा त्याचा आवडता लेखक होता. मात्र त्यासोबत रशियन कादंबऱ्याही तो आवडीने वाचत असे. केवळ रशियनच नाही, तर इतर भाषांमधील साहित्यही वाचायची त्याला आवड होती. मात्र परदेशी भाषा येत नसल्याने केवळ रशियन भाषेत अनुवादित झालेले साहित्यच तो वाचू शकत असे. त्याच्या महाकाय वाचनालयात २५ हजारांपेक्षा जास्त पुस्तके होती. या चरित्रपर ग्रंथाच्या पहिल्याच, 'ब्लडी टायरन्ट अ‍ॅण्ड बुकवर्म' या प्रकरणात स्टालिनचे विद्वान आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व उलगडले आहे. पुस्तके माणसाचे आयुष्य, त्याचा विचार आमूलाग्र बदलू शकतात, यावर स्टालिनचा गाढ विश्वास होता. त्याच्या संग्रही असलेल्या पुस्तकांतून आपल्याला त्याच्या व्यापक दृष्टिकोनाची कल्पना येते. स्टालिन हा क्रूर मनोरुग्ण शासक नव्हता, तर अत्यंत बुद्धिमान, संवेदनशील अभ्यासक होता, हे या प्रकरणातून आपल्याला कळते. दुसऱ्या प्रकरणात स्टालिनच्या खासगी आयुष्यातल्या घटनांचा वेध लेखकाने घेतला आहे. त्याने वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा, त्याच्या भाषणांचा समग्र संग्रह त्याला प्रकाशित करायचा होता. त्याच्या आत्मचरित्रात त्याला हे सारे लेखन समाविष्ट करायचे होते. मात्र त्याच्या मृत्यूपर्यंत हे काम पूर्ण होऊ शकले नाही आणि नंतर ख्रुश्चेव्हने हा सगळा प्रकल्पच रद्द केला. मात्र, जे १३ खंड आधी प्रकाशित झाले होते, ते स्टालिनच्या जीवनकार्यावर उत्तम प्रकाश टाकणारे आहेत.

तिसरे प्रकरण- 'रीडिग, रायटिंग अ‍ॅण्ड रिव्होल्यूशन'मध्ये तरुण स्टालिनचे चरित्र रंगवले आहे. युवा वयात स्टालिन क्रांतीच्या विचारांकडे कसा ओढला गेला, त्याचे शिक्षण, एक अभ्यासक म्हणून त्याचे व्यक्तिमत्त्व, वाचनाची आवड या साऱ्याचे वर्णन केले आहे. सुरुवातीच्या काळात स्टालिन मिशनरी शाळेत शिकला. महाविद्यालयीन शिक्षण सेमिनरी कॉलेजमध्ये सुरू असताना त्याला प्राध्यापक व्हायचे होते, मात्र त्याच काळात रशियात झारच्या अत्याचाराविरोधात सुरू असलेल्या बंडात सहभागी व्हायचे, असे त्याने ठरवले आणि क्रांतिकारक नेता अशी कलाटणी त्याच्या आयुष्याला मिळाली. तरुण वयात, स्टालिन नियमितपणे बायबल वाचत असे, असे या पुस्तकात म्हटले आहे. मात्र, धार्मिक विचारांचा त्याच्या मनावर पगडा होता का? हे सांगणारे कोणतेही पुरावे नाहीत. युवा स्टालिनच्या मनात, जी धर्मभावना होती, तिला इहवादी म्हणता येईल. मात्र नंतरच्या काळात मार्क्सवादी झाल्यानंतर, इतर बोल्शेविक नेत्यांप्रमाणे त्यानेही चर्चविरोधी आक्रमक भूमिका घेत संपूर्ण धर्मशक्तींचे दमन केले होते. दुसऱ्या महायुद्धकाळात, तडजोड किंवा गरज म्हणून काही काळ त्याच्या साम्यवादी शासनाने धर्मसंस्थांशी जुळवून घेतले होते, मात्र, स्टालिन त्याच्या जीवनकाळातल्या कुठल्याही टप्प्यावर सश्रद्ध होता, असे पुरावे नाहीत. १९२२ साली स्टालिनची बोल्शेविक पार्टीच्या सरचिटणीसपदी निवड झाली. त्यानंतर दोनच वर्षांनी लेनिनच्या मृत्यूनंतर त्याच्या वादग्रस्त मृत्युपत्रात त्याने स्टालिनविरुद्ध मांडलेली भूमिका आणि त्यानंतर उठलेले वादळ, यातून स्टालिनचा राजकारणातील एक प्रबळ शक्तिशाली नेता म्हणून कसा उदय झाला, याचेही वर्णन पुस्तकात आहे. पुस्तकाचे चौथे प्रकरण संपूर्णपणे स्टालिनच्या खासगी वाचनालयाची रचना, मोडतोड आणि त्याची पुन्हा उभारणी याची रंजक कथा सांगते. स्टालिनची वाचनाची आवड आणि त्याची अभिरुची यात आहे, पुस्तकांमधून तो काय शिकला, याचाही शोध घेतला आहे. स्टालिनचे कौटुंबिक जीवन, त्याच्या पत्नीची आत्महत्या आणि त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या या वाचनालयाचे काय झाले, हेही या प्रकरणात आहे.

पाचव्या प्रकरणात, स्टालिनची हीच वाचनाची; नव्हे तर अध्ययनाची आवड अत्यंत विस्तृत स्वरूपात मांडली आहे. स्टालिन जी पुस्तके वाचत असे, त्यातल्या नोंदी, टिपणे लिहून ठेवत असे. या वाचनाच्या ध्यासातून आणि त्याने काढलेल्या नोंदी पाहिल्या तर त्याचे वाचन किती सखोल आणि अभ्यासपूर्ण असे, याची माहिती मिळते. प्रत्येक पुस्तकावरचे त्याचे विश्लेषण हा अभ्यासू पद्धतीने पुस्तक परीक्षणाचा एक वस्तुपाठ होता, त्याशिवाय स्टालिनच्या भावनिक स्वभावाचे कंगोरेदेखील पाहायला मिळतात. ज्यांना असा संवेदनशील, बुद्धिमान स्टालिन समजून घ्यायचा असेल, त्यांनी या नोंदी आणि टिपणे बघायला हवीत. विशेष म्हणजे, ट्रॉटस्की या आपला राजकीय विरोधक असलेल्या नेत्याविषयीदेखील त्याने आपल्या टिपणांमध्ये अत्यंत आदराने लिहिले आहे. स्टालिनच्या आत्मचरित्रातील काही भाग, ज्यात त्याच्या आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांचा विचार करण्यात आला आहे त्यात साधारण १९३० ते ४० दरम्यानच्या रशियातील घडामोडींचा उल्लेख आहे. पुस्तकाचे सहावे प्रकरण- 'रिव्हर्स इंजिनीअरिंगः स्टालिन अ‍ॅण्ड सोव्हिएत लिटरेचर' या प्रकरणात स्टालिनचे प्रसिद्ध वाक्य – 'समाजवादी समाजरचनेत लेखकांची भूमिका मानवी मन (आत्मा) घडविण्याची असावी,' हे उद्धृत केले आहे. स्टालिन स्वतः अनेक कादंबऱ्या, नाटके, कथा, कविता वाचत असे. या पुस्तकांतून मानवी व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते, असे त्याचे मत होते.

# विरोधकांच्या एकीत 'बिनचेहऱ्यां' मुळे दुफळी



राष्ट्रपती पदाची उमेदवारी घोषित झाल्यावर द्रौपदी मुर्मू यांना एकदेखील मुलाखत का देता येऊ नये? उपराष्ट्रपती पदाची उमेदवारी धनखड यांना मिळण्यात मोदी-शहांशी एकनिष्ठ असणे किती प्रबळ ठरले? पण विरोधकांच्या एकीत 'बिनचेहऱ्यां'मुळे दुफळी झाली एवढे नक्की.. संसदेचे पावसाळी अधिवेशन आज, सोमवारी सुरू होत असून राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती पदाची निवडणूक हीच या अधिवेशनातील लक्षवेधी बाब असेल. संसदेच्या नव्या इमारतीवर बसलेली सिंहमुद्रेची बेढब प्रतिकृती, असंसदीय शब्दांवरून झालेला वाद, संसदेच्या आवारात निदर्शने करण्यावर आणलेली बंदी हे सगळे विषय केंद्र सरकारविरोधात आक्रमक होण्यासाठी विरोधकांना मिळाले आहेत. त्यामुळे निदान पहिल्या आठवडयात तरी, सभागृहांमध्ये सभात्याग, संसदेच्या आवारात 'सत्याग्रह' करून बंदीहुकमाविरोधात आवाज उठवला जाईल. लोकशाही टिकवण्यासाठी विरोधकांना केंद्र सरकारविरोधात भूमिका घ्यावी लागेल. तशी ती घेतलीही जाईल; पण त्यातून केंद्र सरकारवर किती दबाव येईल, हा खरा प्रश्न आहे. अधिवेशनाच्या काळात विरोधक कितीही आक्रमक झाले तरी, सत्ताधाऱ्यांचे लक्ष राष्ट्रपती-उपराष्ट्रपती पदांच्या निवडणुका जिंकण्यावर असेल. त्यासाठी विरोधकांमधील प्रादेशिक पक्ष भाजपला मदत करत आहेत की नाही एवढाच मुद्दा भाजपसाठी महत्त्वाचा आहे. बाकी, काँग्रेस वा तृणमूल काँग्रेस आदी पक्षांनी सभागृहांमध्ये गोंधळ घातला वा कामकाज बंद पाडले तरी सत्ताधाऱ्यांना फारसा फरक पडेल असे नाही. या आधीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही इंधन दरवाढ, महागाई अशा अनेक मुद्दयांवरून दिवसाच्या पहिल्या सत्रात विरोधकांनी कामकाजात अडथळे आणले, दुपारच्या सत्रात कामकाज होत राहिले, विधेयके संमत होत गेली. या अधिवेशनातही वेगळे चित्र दिसेल असे नव्हे. अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयात उपराष्ट्रपती पदासाठी मतदान होईल, ११ ऑगस्टला नवे उपराष्ट्रपती पदाची शपथ घेतील, कदाचित त्याच दिवशी राज्यसभेचे सभापती म्हणून कारभार हाती घेतील. दुसऱ्याच दिवशी, १२ ऑगस्टला पावसाळी अधिवेशन संस्थगित होईल. अधिवेशनाच्या या चार आठवडयांमध्ये दोन 'निष्ठावान' सर्वोच्च पदी विराजमान झालेले दिसू शकतील.

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आणि पावसाळी अधिवेशन यांमधील साडेतीन महिन्यांच्या काळात देशातील विरोधी पक्ष आणखी कमकुवत झालेला पाहायला मिळाला. त्याची सुरुवात महाराष्ट्रापासून झाली. शिवसेनेत फुटीला फुंकर घालून भाजपने शिंदे गटाशी युती केली आणि राज्यात सरकार स्थापन केले. महाराष्ट्रातील नवनियुक्त सरकार केंद्रातील सत्ताधारी नेतृत्वाचे 'होयबा सरकार' असल्याचे कोणीही नाकारणार नाही. जोपर्यंत या नेतृत्वाची सरकार चालवण्याची इच्छा असेल तोपर्यंत 'नव्या युती'चा प्रयोग सुरू राहील, असा अंदाज कोणीही बांधू शकेल. कुठल्याही राजकीय पदावर 'परावलंबी' व्यक्ती बसल्याने भाजपच्या नेतृत्वाला फरक पडत नाही. भाजपचे पक्षाध्यक्ष नड्डा आहेत; पण पक्षाची खरी सत्ता 'दोघां'कडे आहे! या पार्श्वभूमीवर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्रपणे निवडणूक लढवली तर, पुढील विधानसभा निवडणुकीत भाजपचा पराभव करता येऊ शकेल असे शरद पवार यांनी म्हटले असले तरी, काँग्रेस आणि शिवसेनेला पुन्हा उभे कोण करणार आणि कसे हा प्रश्न विरोधकांना पडला नसेल असे नव्हे. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत भाजपच्या द्रौपदी मुर्मू विजयी होतील. मोदी-शहांनी केलेली मुर्मूची निवड अत्यंत चपखल ठरली, त्यांच्या निवडीमुळे विरोधकांची पुरती कोंडी झाली. विरोधकांचा सर्वसंमत उमेदवार ठरवण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी आक्रमक पुढाकार घेतला होता. पण हळूहळू विरोधकांमधील उत्साह कमी होत गेला आणि अखेर यशवंत सिन्हांना घोडयावर बसवावे लागले. मग मुर्मूची उमेदवारी जाहीर झाली. तिथून विरोधकांचे अवसान गळाले. झारखंड मुक्ती मोर्चाने तसेच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने विरोधकांचा हात सोडला. अगदी काँग्रेसमध्येही यशवंत सिन्हा यांच्या पाठिंब्यावरून चलबिचल सुरू होती. मुर्मूमुळे पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसही अडचणीत आले, ममतांनी आदिवासीविरोधी प्रतिमा निर्माण होऊ नये याची खबरदारी घेतल्याचे पाहायला मिळाले, पश्चिम बंगालमध्ये यशवंत सिन्हा यांचा दौरा झाला नाही. शिवसेनेने मुर्मूना पाठिंबा दिल्यावर सिन्हांनी मुंबईभेटही रद्द केली. मुर्मू आता राष्ट्रपती होतील; पण भाजपमध्ये त्या बिनचेहऱ्याच्या होत्या. त्यांना राष्ट्रीय स्तरावर स्वतःची ओळख नव्हती. उमेदवारी जाहीर झाल्यावर भाजपने त्यांची एकदेखील मुलाखत प्रसारमाध्यमांना घेऊ दिली नाही! मुर्मूचे राजकीय विचार कोणते? त्यांचा राष्ट्रीय राजकारणाचा आवाका काय? 'अग्निपथ'सारख्या वादग्रस्त मुद्दयांवर त्यांचे मत काय? मुर्मूच्या विचारप्रक्रियेबाबत देशातील लोकांना काहीही माहिती नाही, ते माहिती करून देण्याचे भाजपच्या नेतृत्वाने टाळले. विरोधकांचे उमेदवार यशवंत सिन्हा यांनी 'रबर स्टॅम्प' राष्ट्रपती होऊ नका, असे आवाहन केले, त्यालाही मुर्मूनी प्रत्युत्तर दिले नाही. मग, मुर्मूची नेमकी ओळख काय असेल? पण, राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीनिमित्ताने भाजपच्या आणखी एका 'बिनचेहऱ्या'ने विरोधकांच्या एकीच्या दुफळया उडवण्याचे काम अचूक केले असे म्हणता येईल.

# सुखावणारे आकडे..

'दोन अब्ज चार कोटी ६१ हजार ९५ लसमात्रा' हा कोविड लसीकरणात लक्षवेधक आणि महत्त्वाचाही ठरणारा टप्पा भारताने सोमवारी सकाळी गाठला. दोन्ही लस मात्रा घेतलेल्यांची संख्या वाढल्यानंतर, तिसऱ्या मात्रेबद्दल काहीसा निरुत्साह भारतीयांमध्ये दिसून येत होता. तोही घालवून तिसऱ्या 'वर्धक मात्रे'ला प्रतिसाद मिळावा म्हणून केंद्र सरकारने ही मात्रा ७५ दिवस मोफत मिळणार, अशी घोषणा केली. आता तिसऱ्या मात्रेकडेही लोक वळू लागले आहेत. मुळात सार्वत्रिक साथरोगांवरील लशी सर्वकाळ मोफत मिळणाऱ्या आपल्या देशात, एका मात्रेसाठी ७५० रुपये मोजणाऱ्यांचीही संख्या कमी नव्हती, हेच विशेष. याचे श्रेय कोविडच्या जीवघेणेपणाला जसे आहे, तसेच लशीविना प्रवास वा प्रवेश नाकारण्याच्या व्यूहात्मक उपाययोजनांनाही ते द्यावेच लागेल. अनेक प्रगत देशांच्या नंतर आपल्याकडे लसीकरण सुरू झाले, सुरुवातीला 'जगाचे लस-पुरवठादार' होण्याची बढाई मारणाऱ्या भारतात, शेकडो नागरिकांना लसमात्राच उपलब्ध नसल्यामुळे लसीकरण केंद्रात खेटे घालावे लागले, पहाटेच्याही आधीपासून लसीकरणासाठी रांगा लावणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रात लक्षणीय होती, हे सारे आता इतिहासजमा झाल्यासारखे वाटत असले तरी, परिस्थितीचा रेटा सहन करत- पदराला खार लावून सामान्यजनांनी लसीकरणाचा उत्साह दाखवला हे सत्य उरतेच.. त्यातूनच तर 'दोन अब्जांहून अधिक लसमात्रां'चा ऐतिहासिक टप्पा गाठला गेला आहे! लस घेतल्यानंतरही करोनासंसर्ग होतोच, या तक्रारीमुळे लसीकरणाचा उत्साह काही कमी झाला नाही हेही सिद्ध करणारा हा टप्पा आहे. किंबहुना कोविडवरील लशींची उपयुक्तता जगभरात सर्वानाच पटली, मग भारत तरी का मागे असेल? फ्रान्ससारख्या स्वातंत्र्यप्रेमी देशात सुरुवातीला लोकांचे थवेच्या थवे 'आम्हाला लस नको' म्हणत रस्त्यांवर उतरले होते. थोडीफार जाळपोळसुद्धा केली त्यांनी. पण याच फ्रान्समध्ये आज, ७९ टक्के लोकसंख्येने कोविड-लशीच्या दोन्ही मात्रा घेतल्या आहेत.

भारतात अशा 'दोन्ही मात्रा पूर्ण' लोकसंख्येचे प्रमाण आहे ६६ टक्के. अमेरिकेत गर्भपाताच्या अधिकाराला विरोध करणाऱ्या उजव्यांचा कोविड लशीलाही नकारच होता, पण तिथेसुद्धा ६७ टक्के लोकसंख्येने दोन्ही मात्रा घेतल्या आहेत. त्या तुलनेत मानवी विकास निर्देशांकात नेहमी पुढे असणाऱ्या आणि 'सामाजिक सुरक्षे'चा फार बोलबाला ज्यांच्याबद्दल आहे, अशा उत्तर ध्रुवसमीप स्कॅन्डेनेव्हियन देशांपैकी नॉर्वेची ७५ टक्के आणि स्वीडनची ७३ टक्के लोकसंख्या लसवंत आहे. या तुलनेतही भारताचे आकडे आशादायी म्हणावे असेच ठरतात. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेश हे सर्वाधिक २० कोटी ४२ लाख लोकसंख्येचे राज्य. तिथे १४ कोटी ४९ लाखांहून अधिकांनी दोन लसमात्रा घेतल्याचे आकडेवारी सांगते.. याचा अर्थ अमेरिकेहून किंवा स्वित्झर्लडहून (तेथील प्रमाण ६९ टक्के) जास्त- सुमारे ७१ टक्के उत्तर प्रदेशी लोकसंख्या लसवंत आहे. मध्यंतरी महाराष्ट्राला लसपुरवठा न करता तो उत्तरेकडील राज्यांकडे वळवण्यात आल्याचे आरोप झाले होते, अशा आठवणी विसरलो तर उत्तर प्रदेश हा अन्य राज्यांपेक्षा लसीकरणात पुढे असल्याचा आनंद मानता येईल. हे आकडे सुखावणारेच आहेत. वर्धक मात्रा हक्काने मोफत मिळवण्याच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष न केल्यास, हीच संख्या तीन अब्जांवरही जाऊ शकेल!

# आता मंत्रिमंडळ हवेच कशाला ?



एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री व देवेंद्र फडणवीस हे कॅबिनेट मंत्री म्हणून दोघांचा शपथविधी पार पडला, त्याला २० दिवस उलटले. असे असूनही बिचारे सरकार न्यायालयीन प्रक्रियेत सापडल्याने त्यांचा मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकलेला नाही. तरीही गेल्या पंधरवडयात अनेक लोकोपयोगी निर्णय घेण्याचा सपाटा लावला हे कौतुकास्पद म्हणावे लागेल. कारण राज्याच्या इतिहासात अशी कामगिरी कोणत्या सरकारने केल्याचे ऐकिवात नाही. आज देशात मोदी-शहांच्या निणय्प्रक्रियेत अन्य मंत्र्यांचे अस्तित्व जाणवत नाही, त्याच प्रकारे जर फडणवीस- शिंदे सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करत असतील तर इतर मंत्र्यांची गरज असल्याचे दिसत नाही. फक्त सरकारने निर्णय घेताना राज्यघटनेच्या मूळ तत्त्वांना बाधा येईल असे चुकीचा पायंडा पाडणारे निर्णय घेऊ नयेत हीच अपेक्षा. त्याचप्रमाणे धोरणात्मक निणय् घेताना त्याच्या परिणामांचाही विचार करून, त्यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. अन्यथा असे धोरण राज्याला अधोगतीकडे नेण्याची शक्यता आहे. तसेच सत्ताबदल झाल्यावर केवळ श्रेयासाठी जुन्या निणय्ांची फिरवाफिरव करणे उचित नाही. लोकशाहीत विरोधकसुद्धा सरकारचा एक घटक असतात, हे लक्षात घेऊन कामांचा सपाटा अवश्य लावावा. सध्या तर पावसाळी अधिवेशन पुढे ढकलले आहे. परिणामी विस्तार करता येणार नाही. जरी केला तरी मंत्रिमंडळ कायदेशीरदृष्ट्या पात्र सदस्यांचेच असेल की नाही हेसुद्धा अनिश्चित आहे. त्यामुळे सरकारी यंत्रणेवर होणारा खर्च वाचवायचा असेल तर मग मंत्रिमंडळ हवेच कशाला? त्यातच 'पद नको' म्हणणाऱ्या देवेंद्रजींना पक्षाने तर सरप्राईज गिफ्ट दिले आहे. दोघेही अनुभवी व कर्तबगार मंत्री असून प्रशासन चालवण्यासाठी सक्षम आहेत. 'विरोधकांची जागा आक्रसतेय ..' (लोकसत्ता – १७ जुलै) हा सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांच्या जयपूर येथील कार्यक्रमाचा वृत्तांत वाचला. गेली काही वर्षे विरोधक आक्रसताहेत हे राज्यसभेने विरोधकांचे बहुमत असून देखील जेव्हा 'कळीची विधेयके' मंजूर केली तेव्हाच लक्षात आले होते. सुरुवातीला 'साम, दाम' व नंतर 'दंड , भेद' असे सत्ता-तंत्राचे स्वरूप या निमित्ताने उघड झाले, आणि आता राष्ट्रपती निवडणुकीच्या निमित्तानं 'विरोधी एकजूट' ही किती तकलादू होती हे त्यातून शिवसेना, अकाली दल इत्यादी केंद्रातील सत्ताधारी उमेदवारास पाठिंबा देते झाले त्यावरून, तसेच ज्या ममता बॅनर्जीनी राष्ट्रपती पदासाठी विरोधकांच्या संयुक्त उमेदवारीचा घाट घातला त्यांच्याच द्रौपदी मुर्मु यांच्या उमेदवारीबाबतच्या ताज्या वक्तव्यावरून दिसून आले. आज उद्धव ठाकरेंसमोर पक्षाच्या अस्तिवाचा जो प्रश्न आहे तो इतरांबाबत, त्यांनीही योग्य ती पक्षबांधणी न केल्याने आज ना उद्या उपस्थित होणार असे आज वाटते. आणीबाणीपूर्व काळात ज्याप्रमाणे विरोधक विखुरलेले होते तसेच काहीसे दृश्य आजही पाहायला मिळते. पण त्या वेळी आणीबाणीने विरोधकांना एकत्र आणले. 'एक देश- एक पक्ष' आणि 'एक पक्ष – एकच नेता' हे लोकशाहीला मारक असते हे आमच्या लक्षात येईल तो सुदिन.

राजकीय विरोधकांना आता थेट शत्रू ठरविले जात असून हे लोकशाही प्रणालीस घातक असल्याचे परखड मत सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी व्यक्त केले आहे (बातमी : लोकसत्ता – १७ जुलै), ते सरकारने गांभीर्याने घेतले पाहिजे. संसदीय लोकशाही प्रणालीत विरोधी पक्ष खूप महत्त्वाचा असतो. पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना ते विरोधकांना सन्मानाने वागवीत असत. एखाद्या विधेयकावर नाथ पै बोलणार असतील तर स्वतः नेहरू, शिक्षणमंत्री मौलाना आझाद सभागृहात आवर्जून उपस्थित राहात असत, इतकेच नव्हे तर पै यांच्या भाषणातील मुद्दे ते लिहून घेत असत. एखाद्या परदेशी पाहुण्यांचे देशात आगमन झाल्यावर त्यांचा परिचय पंडितजी प्रथम विरोधी पक्षनेत्यांशी करून देत आणि नंतर मंत्रिमंडळातील सदस्यांशी, अशी त्यांची कार्यपद्धती होती.. पंडितजींना 'फाइन डेमोक्रॅट' म्हणतात, ते उगाच नव्हे. नेहरूंनंतर अटलबिहारी वाजपेयी यांचे, तसेच महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांचे विरोधी पक्षनेत्यांशी जिव्हाळ्याचे सबंध होते. सत्ताधाऱ्यांनी याचा विचार करावा असे मनापासून वाटते. 'पती जिवंत असताना एखाद्या महिलेने गळ्यातील मंगळसूत्र काढणे हे पराकोटीचे मानसिक क्रौर्य,' अशी टिप्पणी करत मद्रास उच्च न्यायालयाने एका अर्जदाराचा घटस्फोट मंजूर केला, असे वृत्त (लोकसत्ता – १५ जुलै) वाचले. आर्यांपेक्षा भिन्न अशी द्रविडी संस्कृती असलेल्या व पेरियार यांच्यासारख्या सुधारणावाद्याचा वारसा सांगणाऱ्या तमिळनाडूच्या न्यायालयाने असा निर्णय द्यावा, याचे आश्चर्य वाटते. वास्तविक हा निणय् म्हणजे पुरुषसत्ताक संस्कृतीला उचलून धरण्याचा प्रकार आहे. मंगळसूत्र ही संबंधित महिलेच्या वैवाहिक स्थितीविषयी संकेत देणारी एक 'पवित्र' वस्तू असते आणि 'केवळ पतीच्या निधनानंतरच ते गळ्यातून काढले जाते,' अशी पुस्तीही न्यायालयाने जोडली. पण पतीच्या निधनानंतरच मंगळसूत्र काढले जाते; मग आज ज्या अनेक स्त्रिया पतीच्या निधनानंतरही पतीविषयीच्या भावनिक आस्थेमुळे किंवा विकृत अशा काही समाजघटकांपासून संरक्षण मिळावे म्हणून मंगळसूत्र घालतात त्यांचे काय? असेच विचित्र निणय् अनेक प्रकरणांत देशातील न्यायालये अलीकडे देत असतात. त्यामुळे प्रश्न पडतो की न्यायालयांना झाले आहे तरी काय.

'न्यायालयाने स्थानिक भाषा वापरल्यास अनेक समस्या सुटतील' असे मत केंद्रीय कायदामंत्री किरेन रिजिजू यांनी व्यक्त केल्याची बातमी (लोकसत्ता – १७ जुलै) वाचली. महाराष्ट्र शासन मराठीचा वापर कार्यालयात करा असे प्रतिवर्षी मराठी भाषादिनी आग्रहाने करते. पण अद्यापही वकील मंडळी न्यायालयात दावे दाखल करताना इंग्रजीचाच वापर करतात, मातृभाषेवर अन्याय करतात. यात न्यायालयानेच हस्तक्षेप करून स्थानिक भाषा ज्या राज्याची जी असेल त्यातच प्रकरण सादर करण्याचा आग्रह धरावा. महाराष्ट्रात न्यायालयीन कामकाज व निणय् हे मराठीतच करावे. जेणेकरून जो न्यायालयात न्याय मागण्यासाठी आला त्याला त्वरित आकलन होईल. या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक भाषा वापरण्याच्या सूचना तालुका/जिल्हा/राज्य न्यायालये यांना द्याव्यात.

# दुभत्यांचा दुर्विलास !

लाभांशाच्या रूपाने केंद्र सरकारास वरचेवर साहाय्य करीत राहणे हे ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेचे प्रमुख कर्तव्य नाही, घसरता भांडवली बाजार सावरणे वा बुडती आयडीबीआय बँक वाचवणे हे ज्याप्रमाणे आयुर्विमा महामंडळाची जबाबदारी नाही त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारला आर्थिक मदत पुरवणे आणि कोणत्याही उत्पन्नहमीशिवाय पायाभूत सुविधा निर्मितीची जबाबदारी शिरावर घेत राहणे हे 'मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणा'चे (एमएमआरडीए) मुख्य उद्दिष्ट नाही. तथापि हे असे असले तरीही त्या त्या वेळी सत्ताधारी आपल्या अखत्यारीतील या अशा यंत्रणांस स्वतःची सोय, राजकीय निकड इत्यादींसाठी वरचेवर वाकवतच असतात. केंद्र सरकारला रिझर्व्ह बँकेने अलीकडच्या काळात किती लाभांश दिला, आयडीबीआय बँकेसाठी आयुर्विमा महामंडळाचे विमाधारकांचे किती पैसे खर्च केले आणि एमएमआरडीएने महाराष्ट्र सरकारसाठी कोणकोणते प्रकल्प हाती घेतले हे पाहिल्यास या यंत्रणांच्या सरकारी दुरुपयोगाचा अभ्यास करता येईल. या अशा अभ्यासाची सामाजिक सवय आपल्याकडे नाही आणि पुरेशा आर्थिक साक्षरतेअभावी नागरिकांस त्यांची गरजही वाटत नाही. असो. तूर्त एमएमआरडीएविषयी.

याचे कारण राज्यातील नव्या कोऱ्या सरकारची आपल्या ताज्या निणऱ्यात एमएमआरडीएला ६० हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्याची अनुमती देण्याची घोषणा. सध्याच्या प्रथेप्रमाणे सरकारच्या या निर्णयाचे ठरावीक वर्गात स्वागतही झाले. विविध पायाभूत सोयीसुविधा उभारण्यासाठी या कर्जाचा विनियोग होईल. टप्प्याटप्प्याने उभारल्या जाणाऱ्या या कर्जाच्या पहिल्या टप्प्याच्या १२ हजार कोटी रुपयांसाठी राज्य सरकार हमी देणार आहे. वास्तविक एमएमआरडीएला कर्ज उभारणीसाठी राज्याच्या हमीची गरज नाही. बाजारात हे राज्य सरकारी प्राधिकरण अद्याप आपला राब राखून आहे. तेव्हा कर्ज उभारणीस काही अडथळा येण्याची शक्यता नाही. याबाबत उलट राज्य सरकारचा लौकिक अभिमान बाळगावा असा नाही. याआधी एन्रॉन वादात आणि २००० सालानंतर 'आयडीबीआय'कडून राज्य सरकारी हमी वटवण्याची वेळ आली होती. तेव्हा राज्याच्या पाठिंब्यापेक्षा एमएमआरडीएच्या पुण्याईतून कर्ज उभे राहील. पण महाराष्ट्राच्या या सर्वात श्रीमंत प्राधिकरणाच्या तिजोरीत खडखडाट होऊन कर्जे उभारण्याची वेळ आलीच का, हा यानिमित्ताने चर्चा करायला हवा असा मुद्दा. संपूर्ण मुंबई, रायगड ते पालघर जिल्ह्याचा बहुतांश भाग यांवर नियंत्रण असलेले एमएमआरडीए हे राज्य सरकारचे 'एटीएम' मानले जात होते. राज्य सरकारला जेव्हा जेव्हा रोख रकमेची गरज लागली तेव्हा तेव्हा राज्याची अब्रू राखण्यासाठी एमएमआरडीएच पुढे आले. इतकेच काय; जेव्हा सहाव्या वेतन आयोगाने राज्य सरकारवर प्रचंड वेतन बोजा वाढला त्या वेळी आपल्याच कर्मचाऱ्यांना पोसण्यासाठी तत्कालीन राज्य सरकारने या एमएमआरडीएकडून पैसे हातउसने घेतले हा ताजा इतिहास आहे. अर्थात यातील 'हातउसने' हा शब्दप्रयोग याबाबत अस्थानी ठरतो. कारण केंद्रीय अल्पबचत संचालनालयाकडून घेतलेली रक्कम परत देण्याची गरज ज्या प्रमाणे केंद्र सरकारला वाटत नाही; त्याचप्रमाणे एमएमआरडीएची देणी देण्याची आवश्यकता राज्य सरकारला जाणवत नाही. एमएमआरडीएचे पदसिद्ध अध्यक्ष नगरविकास मंत्री असतात आणि हे खाते बहुतेकदा मुख्यमंत्र्यांकडेच असते. त्यामुळे एमएमआरडीए बोंब तरी कोणाविरोधात ठोकणार? राज्याचे नेतृत्व करणाराच जेव्हा राज्य सरकारच्याच मालकीच्या महामंडळाकडे पैसे मागतो वा काही आदेश देतो तेव्हा त्या आदेशांचे पालन होणार हे ओघाने आलेच. आणि अलीकडच्या काळातील अधिकाऱ्यांचा लौकिक लक्षात घेता अशा काही विरोधाची अपेक्षा बाळगणेही भाबडेपणाचे ठरावे. तसे काही होणे नसल्याने आर्थिक जाणिवा जाग्या असणाऱ्यांनी तरी याची दखल घ्यायला हवी.

## थोडक्यात

# भद्रावतीत आढळला पट्टेरी मण्यार साप



**महेश निमसटकर**

**भद्रावती :** संपूर्ण महाराष्ट्रात फक्त गडचिरोली जिल्ह्यातच आढळणारा पट्टेरी मण्यार साप भद्रावतीत आढळून आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सदर साप येथील पॉवर ग्रीड मधील बगिच्याजवळ नुकताच आढळून आला. येथे साप असल्याची माहिती येथील रोजंदारी कामगार राहुल बावणे याने त्वरित सर्पमित्र श्रीपाद बाकरे यांना दिली. बाकरे यांनी आपल्या सर्पमित्र सहका-यांना साप पकडण्यास सांगितले. त्यानुसार सापाला पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. दरम्यान, सर्पमित्र श्रीपाद बाकरे यांनी सदर साप केवळ गडचिरोली जिल्ह्यातच आढळून येत असून भद्रावतीत कसा आढळला असा प्रश्न उपस्थित करुन कदाचित ट्रान्स्फार्मरच्या वाहतुकीत आला असावा, अशी शंका व्यक्त केली आहे.

# भर पावसात अनाथ मावशीचा केला अंत्यविधी



**विकास ठाकरे**

**अकोला :** मरण हे प्रत्येका च्या आयुष्यात अटळ आहे. परंतु एका अनाथ व्यक्तीला जर अशा कठीण परिस्थितीमध्ये वरून मुसळधार पाऊस आणि आपला कोणी नातेवाईक नाही आपल्याला कोण खांदा देणार आपले मरण कसे होणार परंतु ज्याला कोणी नाही त्याला देव आहे, असे म्हणणे वावगे ठरत नाही. अकोला तालुक्यातील पातुर नंदापूर या गावी अशीच एक घटना घडली. १८ जुलै सकाळी पाच वाजताच्या दरम्यान पार्वताबाई राजनकर वयाच्या ८० वर्षे निधन झाले. पार्वताबाई पातुर नंदापूर मध्ये पन्नास वर्षापासून वास्तव्यात होती तरूणांमध्ये का दवाखान्यामध्ये काम करायची पूर्ण गावाची सेवा तिने केली. परंतु म्हातारपण आल्यानंतर काम धंदा होत नसल्यामुळे गावात अनाथ म्हणून राहू लागली. परंतु शरीर कुठ पर्यंत साथ देणार एक वेळ शरीराने साथ सोडली आणि एका खाटेवर चार वर्ष आपल्या मृत्यूशी झुंज देत होती.आपले करणार कोण परंतु देव दुथा सारखा अशोक हेरोळे नावाचा माणूस त्या मावशीची सेवा करण्यासाठी हजर झाला चार वर्षे लगातार पार्वताबाई मावशीची सेवा केली.आणि शेवटी आज रोजी का मावशीची प्राणज्योत मावळली. मावशीचा अंत्यविधीसाठी पातुर नंदापूर चे सरपंच सचिन लाखे यांनी पुढाकार घेऊन त्या अनाथ मावशीची भर पावसामध्ये गावातील काही मंडळी यांनी मुसळधार पावसामध्ये त्या मावशी चा अंत्यविधी करण्यात आला. या अंत्यविधी प्रसंगी दत्ता महाराज आगळे, अशोक हेरोडे, सचिन लाखे, निलेश आव्हाळे, विकास ठाकरे, खंडू बासोडे, बाळू भातुलकर, मनोज इंगळे, रोशन दुबे, गावातील बरीचशी मंडळी हजर होते.

# आजादी का अमृत महोत्सवानिमित्त सुमित्राबाई अंधारे कृषी महाविद्यालयाचा मोठा सहभाग





**अविनाश पोहरे**

**पातुर :** १७ जुलै २२ रोजी आजादी का अमृत महोत्सवा निमित्त राष्ट्रीय महामार्ग व सडक निर्माण विभागाच्या माध्यमातून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमाच्या अतिथी अकोल्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती निमा अरोरा मॅडम तसेच डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास भाले व इतर मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. ह्या कार्यक्रमासाठी श्रीमती सुमित्राबाई अंधारे कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक व विध्यार्थी व विद्यार्थिनी यांनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदऊन वृक्षारोपण केले.महाविद्यालयाच या रावे च्या विध्यार्थी विद्यार्थिनींची ह्या कार्यक्रमासाठी मोठया प्रमाणात उपस्थिती होती असे कृषी महाविद्यालया कडून प्रा. ओम जाधव यांनी कळविले आहे.

# राळेगाव तालुक्यात अनेक गावांना समद्राचे रूप



**वृषभ दरोडे**

**राळेगाव :** सर्वत्र पाणीच पाणी राळेगाव तालुक्याला सर्वाधिक पावसाचा फटका अनेक ठिकाणी नदी नाल्याला पूर , पुरबाधिताना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न. रात्रीपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने सर्वत्र दाणादाण उडविली आहे येवती या गावासह अनेक गावांचा शेजारच्या गावाशी या पुराच्या पाण्यामुळे संपर्क तुटला त्यामुळे काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले नदी नाल्याच्या काठी आणि खोलगट भागांत राहणाऱ्या काही लोकांच्या घरात व जनावरांच्या कोठ्यात पाणी शिरले आहे तिथे बऱ्याच प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती आहे. अनेक ठिकाणी शेती पीक पाण्याखाली आली आहे. तर हजारो हेक्टर मधील शेती खरडून गेली आहे तसेच अनेक ठिकाणी गाव शिवार जलमय झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे मोठं नुकसान झाल्याची माहिती शेतकऱ्यांकडून मिळतेय. ज्या गावकऱ्यांच्य घरात पुराचे पाणी शिरले, तिथे राहणाया गावकऱ्यांना गावातीलच शाळा किंवा लगतच्या सुरक्षित स्थळी हलवण्याची तयारी स्थानिक पातळीवर गावकरी आणि तालुका प्रशासन आणि घेत आहे, अशी माहिती राळेगावची उपविभागीय अधिकारी शैलेश काळे यांनी दिली आहे. विशेष म्हणजे रामतीर्थ या भागातही मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळला आणि त्यामुळे वर्धा नदी ओसंडून वाहत आहे. त्यामुळे रामतीर्थ आणि लगतच्या भागात प्रशासन लक्ष ठेवून आहे तर वडकी झाडगाव या मार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात आल्याची माहिती राळेगाव उपविभागीय अधिकारी यांनी दिली आहे. घाटंजी, पांढरकवडा सह यवतमाळ तालुक्यातही पावसाने मोठं नुकसान केलं आहे. जिल्ह्याच्या राळेगाव तालुक्यातील झाडगाव सावंगी आदी भागाना पाण्याचा फटका बसलेला आहे आणि शिवाय खैरी माढळी भागातुन वाहणारी नदी ओसंडून वाहत असल्याचे स्थानिक गावकऱ्यांनी सांगितले आहे एकूणच पावसामुळे राळेगाव आणि संपूर्ण तालुक्यात शेतीचे पिकांचे आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. आता या परिस्थितीत आपत्ती व्यवस्थापन विभाग जिल्ह्यात लक्षात ठेवून आहे. जिथे नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याची गरज आहे. त्याठिकाणी प्रशासन अलर्ट होऊन कार्य करीत आहे.

# अपघातात एक ठार, एक गंभीर



**महेश निमसटकर**

**भद्रावती :** रिपरिप पावसात दुचाकी स्लीप होऊन झालेल्या अपघातात एक जागीच ठार, तर एक गंभीर जखमी होण्याची घटना गुरुवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास चंद्रपूर-नागपूर महामार्गावर भद्रावती शहरापासून ६ कि.मि. अंतरावर निंबाळा फाट्यावर घडली.अजिंक्य पंढरी खिरटकर (२८) रा. ओंकार ले-आऊट भद्रावती असे मृतकाचे नाव आहे. तर आशिष दिवाकर गौरकार (२६) रा. नवीन मच्छी मार्केट, भद्रावती असे गंभीर जखमीचे नाव आहे. दोघेही काही कामाकरिता दुचाकीने चंद्रपूरला गेले होते. दरम्यान, काम आटोपून परत येताना निंबाळा फाट्यावर त्यांची दुचाकी स्लिप होऊन खाली पडली. त्यात अजिंक्यच्या डोक्याला जबर मार लागून तो जागीच ठार झाला. तर आशिष हा गंभीर जखमी झाल्याने त्याला चंद्रपूर येथील खाजगी रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. अजिंक्य हा आय. टी. आय. झाला होता. त्याने घराजवळच हार्डवेअर आणि बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स चे दुकान थाटले होते. तसेच तो स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात बी.ए.द्वितीय वर्षाला शिकत होता. तर आशिष हा चंद्रपूर येथे विद्युत वितरण कंपनीत आपरेटर म्हणून नोकरीला आहे. अजिंक्यच्या पार्थिवावर पिंडोणी स्मशानभूमीत शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आप्तेष्ट व शहरातील नागरिक उपस्थित होते.


# भद्रावती येथील ऐतिहासीक गणेश मंदिर परिसरातील गवराळा तलावाचा ओव्हरफ्लो सुरू



**महेश निमसटकर**

**भद्रावती :** सततच्या अतिवृष्टीमुळे शहरातील तलाव तुडूंब भरले असुन शहरातील ऐतिहासिक वरदविनायक गणेश मंदिरा शेजारील गवराळा तलावाचा ओव्हरफ्लो दि.१४रोज गुरुवारला पहाटेपासून सुरु झाल्याने परिसराला वाटर पार्कचे स्वरूप आले आहे. या ओव्हरफ्लो मधुन तलावातील मासे मोठ्या संख्येने वाहुन जात असुन त्याचा फटका येथील मत्स्यव्यवसायीकांना बसला आहे. हा ओव्हरफ्लो पाहण्यासाठी परिसरातील नागरिक गर्दी करीत असुन बच्चे कंपनी मात्र या ओव्हरफ्लो मधुन वाटर पार्क चा आनंद लुटत आहे. शहरात तथा तालुक्यात पावसाचा जोर काहिसा ओसरला असला तरी आणखी अतिवृष्टिची भिती मात्र कायम आहे. गेल्या तिन वर्षात यावर्षी प्रथमच या तलावाचा ओव्हरफ्लो पहिल्याच पावसात सुरु झाला आहे. शहरातील सर्वच लहानमोठे तलाव तुडूंब भरलेले असुन त्यांची पाणी साठविण्याची क्षमता संपलेली आहेभविष्यात हे तलाव फुटण्याची किंवा ओव्हरफ्लो होण्याची भिती आहे.

# एन.सी.सी च्या विद्यार्थ्यांना पोलीस भरती व अग्निपथ योजनेत विशेष गुण - सुभाष इंगळे






एनसीसी मुळेच मी दिल्लीच्या राजपथावरती आर डी सी परेड मध्ये कला व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये सहभागी होण्याची संधी २६ जानेवारी २०१९ ला मिळाली होती. - **कॅडेट्स ओम सुहास देवकर, आरडीसी परेड दिल्ली**

**अविनाश पोहरे**

**पातुर :** स्थानिक तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पातुर येथे ११ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अकोला च्या अंतर्गत वर्ग आठवी व नववी करिता एनसीसी युनिट ची स्थापना गेल्या पन्नास वर्षांपूर्वी करण्यात आलेली आहे. आणि याच विभागाने देशाला देश सेवा करण्याकरिता अनेक सैनिक प्रदान केलेली आहेत. एनसीसीचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन सुभाष इंगळे एनसीसी ऑफिसर तुळसाबाई कावल विद्यालय पातुर यांनी केले आहे. पुढे बोलताना ते म्हणाले एनसीसी चे ए ,बी आणि सी प्रमाणपत्रामुळे अनेक फायदे आहेत. त्यामध्ये लष्कराच्या तिन्ही दलामध्ये अधिकारी किंवा जवान म्हणून काम करण्याची संधी मिळते. यावर्षी तर अग्निपथ योजनेमध्ये सुद्धा एनसीसीच्या विद्यार्थ्यांना बोनस अंक मिळणार आहेत. सशस्त्र दलामध्ये अग्निपथ योजनेद्वारे भरती होणा्या विद्यार्थ्याला अग्निवीर म्हणून संबोधल्या जाईल. या तरुणांना देशाची सेवा करण्याची आणि राष्ट्र उभारण्याकरिता संधी मिळेल. अग्नीवीर योजने अंतर्गत बीएसएफ, सीआरपी, सीआरपीएफ, आयटीबीपी, पोलीस भरती आदि सर्वच रक्षण क्षेत्रात विशेष आरक्षण मिळणार आहे. व शिक्षण सुद्धा पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे. यावर्षीपासून पोलीस भरतीमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रानुसार विशेष गुण मिळणार आहेत. एनसीसीच्या ए प्रमाणपत्रानुसार २ड्ढ बी नुसार ३ड्ढ आणि सी प्रमाणपत्रानुसार ५ड्ढ अतिरिक्त गुण विद्यार्थ्यांना भरतीमध्ये मिळणार आहेत. तसेच अग्निशमन दलामध्ये सुद्धा या गुणांचा उपयोग होतो, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना अतिरिक्त तीन गुण मिळतात. पॉलिटेक्निक्स महाविद्यालयात पंधरा जागा राखीव असतात. अभियांत्रिकी विद्यालयामध्ये दहा जागा राखीव असतात. आयटीआय मध्ये प्रवेश करण्याकरिता सुद्धा अतिरिक्त गुण मिळतात. पॅरामिलिटरी फोर्स मध्ये अतिरिक्त दहा गुण मिळतात. सी प्रमाणपत्र उत्तीर्ण झालेल्या कॅडेट्सला खाजगी क्षेत्रामध्ये संरक्षण अधिकारी म्हणून संधी मिळू शकते. एनसीसी सैनिकांमध्ये शिस्त आणि वेळेचो काटेकोरपणे पालन करण्याची शिकवण रुजू करते आणि देशाला जबाबदार नागरिक मिळवून देण्यामध्ये मोलाचा वाटा ठेवते. त्यामुळे आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांनी एनसीसी चे फायदे लक्षात घेऊन एनसीसी मध्ये प्रवेश घेऊन अभ्यासाचे पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

# माजरी तिसऱ्यांदा जलमय, पुन्हा जन जिवन विस्कळीत



**महेश निमसटकर**

**भद्रावती :** मान्सुनचे जोरदार आगमन झाल्याने सर्वत्र मोठ्या प्रमानात पाउस पडला. सर्व नदी नाले तलाव धरणं भरलेली आहे.त्यामुळे माजरी गावात नदीचे पाणी शिरल्याने तेथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. नदी काठच्या घरांना खाली करुन सुरक्षीत ठिकानी हलवीन्यात आले आहे. जनता स्वयं स्फुर्तिने मदतीला धाऊन येत आहे. मात्र प्रशासनाचे फार दुर्लक्ष होताना दिसत आहे. मुळात तिसऱ्यांदा माजरी गावात पुराचे पानी शिरले असल्याने लोकांचे हाल होत आहे.जवळच ओपन कास्ट कोळसा खान असल्याने त्या खानीतील मातीच्या ढिगाऱ्याने पानी प्रवाहाला अळथळा निर्माण होत आहे. त्यामुळे सुद्धा सलग तिसऱ्यांना पुराचे पानी गावात आणी लोकांच्या घरात शिरले आहे. त्यातच अप्पर वर्धा आणी इरई धेरनाचे दरवाजे उघडल्याने पाणी पातळी आनखीनच वाढली आहे. एका रात्री संपुर्ण माजरी गावात पाणी शिरले आहे. आंबेडकर वार्ड, एकता नगर तसेच वार्ड न. ३ मधे पुराचे पाणी शिरले आहे. पुरामुळे जंगली जनावरे गावात शिरत आहे. तसेच रहदारीचे सर्व मार्ग बंद असल्याने जनतेत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिरना नदी पुल, वर्धा नदी पुल पाटाळा येथे माजरी पोलीस प्रशासना मार्फत सुरक्षा प्रदान करण्याकरीता बंदोबस्त लावण्यात आली आहे.

# पातुर नंदापूर परिसरामध्ये पावसाने केला कहर



**विकास ठाकरे**

**अकोला :** तालुक्यातील पातुर नंदापूर परिसरामध्ये पंधरा दिवसापासून लगातार रिमझिम पाऊस सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांचे व नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते. रिमझिम पाऊस सुरू असतानाच शेतकऱ्याचे पिकांची वाढ थांबल्यामुळे व मागील पेरणी असल्यामुळे बियाण्याचे अंकुर या पावसाने सडून गेले होते. परंतु पावसाचा आणखी जोर वाढल्यामुळे १७जुलै पासून लगातार मुसळधार पावसाला सुरुवात झाली. भरपूर प्रमाणात पाऊस पडल्यामुळे सर्व नदी नाल्यांना पातळीच्या वर पाणी वाहू लागले पूर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे आजूबाजूच्या गावातील संपर्क तूटले सोनखास, पिंजर, बोरगाव खुर्द, कानडी, या गावातील सर्व नदी नाल्यांना पूर आल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे .शेतांमध्ये चोहीकडे पाणीच पाणी भरून दिसत आहे या पावसाने शेतकऱ्यांचे आणखीन एक संकट निर्माण केले आहे. शेतकऱ्यांचे सर्व पीक पाण्याखाली असून शेकडो हेक्टर शेती चे नुकसान झाले आहे. एक महिन्याचे पीक असताना त्या पिका वरून पाणी फिरल्यामुळे उत्पन्न होण्याची आशा सोडून दिली आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

काही शेतकऱ्यांची पिके खुरपणी वर आली असताना सुद्धा पावसामुळे शेतकऱ्याला आपल्या शेतीची खुरपणी करता आली नाही. काही प्रमाणात पिके चांगले असताना सुद्धा या पावसामुळे जमिनीवर डोलणारी पिके सुद्धा नष्ट झाली आहे. पावसामुळे शेतामध्ये तन जास्त प्रमाणात असल्यामुळे तणनाशकाची फवारणी करण्यात आली. परंतु पावसामुळे फवारणीचा फायदा झाला नसल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. नदी नाले तुडुंब भरून जात आहेत संपूर्ण शेतामध्ये पाणीच पाणी दिसत आहे. बऱ्याचशा शेतकऱ्यांचे पिक विमा काढण्याचो बाकी असल्यामुळे शेतकऱ्यांना पिक विमा आता कसा काढायचा हे सुद्धा संकट शेतकऱ्यांचा सामना करत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पातुर नंदापूर, सोनखास, बोरगाव खुर्द,परिसरातील पिक पाहणी करावी व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

# निखिल काळे यांचा पत्रकार संघातर्फे सत्कार



**महेश निमसटकर**

**भद्रावती :** तालुक्यातील पानवडाळा गावचे रहिवासी आणि सध्या लडाख येथे कर्तव्यावर असलेले नायक सैनिक निखिल सुधाकर काळे यांचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ तालुका शाखा भद्रावतीच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य तथा तालुका कोषाध्यक्ष रुपचंद धारणे यांच्या हस्ते निखिल काळे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका सरचिटणीस शाम चटपल्लीवार आणि निखिल काळे यांचे मोठे बंधू विठ्ठल सुधाकर काळे उपस्थित होते. निखिल काळे दि. २ जुलै रोजी एक महिन्याच्या सुट्टीवर पानवडाळा या स्वगावी आले होते. दरम्यान, दि.९ जुलै रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास टाकळी-पानवडाळा रस्त्यावर असलेल्या पुलावरून टाटा मॅजिक ऑटो पुरात वाहून गेल्याची माहिती मिळताच क्षणाचाही विलंब न करता विठ्ठल आणि निखिल हे दोघेही बंधू घटनास्थळी दाखल झाले. लगेच निखिल यांनी कसलाही विचार न करता पाण्यात उडी घेतली व ऑटोतील प्रवाशांना वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यात त्यांना यश मिळून पाच जणांचे प्राण वाचले. याबद्दल सर्वांनी निखिल यांचे आभार मानले. तर संपूर्ण जिल्ह्यात त्यांच्या साहसाचे कौतुक करण्यात आले.

# कृषी अधिकारी यांनी पूरग्रस्त शेतीची केली पाहणी



**अभिजीत फंडाट**

**अकोला :** तालुक्यातील कंचनपूर येथे तालुका कृषी अधिकारी श्री. एस आर जांभूळकर आगर सर्कल कंचनपुर अमानतपूर बदलापूर लोणाग्रा पाळोदी गोत्रा उगवा व तसेच कंचनपुर गावांची पूर पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधला त्यांना मार्गदर्शन केले व कोणते शेतकरी शासनाच्या निधीपासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही दिली त्यानंतर लगेच वृक्षारोपण सुद्धा कृषी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामसेवक शिंदे कृषी पर्यवेक्षक श्री सि.पी. नाव काय तंत्रज्ञान समन्वय क सुमित घुले कृषी साहेब टाकेकृषी सहायक प्रवीण बंड सरपंच उपसरपंच पोलीस पाटील गावकरी ग्रामस्थ शेतमजूर हे हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामसेवक अरविंद शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपसरपंच शिवशंकर पाटील यांनी केले.

## थोडक्यात

# खाण माफियांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याला चिरडलं




**साप्ता. अधिकारनामा**

**हरियाना :** दगडांचं अवैध उत्खनन रोखण्यासाठी गेलेल्या एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या अंगावर ट्रक घातल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपींनी दगडाने भरलेला ट्रक संबंधित पोलीस अधिकाऱ्याच्या अंगावर घातला. या दुर्दैवी घटनेत पोलीस अधिकाऱ्याच्या जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर खाण माफियांनी घटनास्थळावरून पळ काढला असून परिसरात दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे. आरोपींना जेरबंद करण्यासाठी शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत. सुरेंद्रसिंग बिश्नोई असं मृत पावलेल्या पोलीस अधिकाऱ्याचं नाव असून ते डीएसपी दर्जाचे पोलीस अधिकारी होते. ही घटना हरियाणातील नूह याठिकाणी घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अरवली पर्वत रांगेत पाचगाव येथे अवैध पद्धतीने दगडांचं उत्खनन केलं जात असल्याची गुप्त माहिती सुरेंद्रसिंग यांना मिळाली होती. त्यानुसार, आज सकाळी अकराच्या सुमारास सुरेंद्रसिंग पोलीस पथकाला घेऊन घटनास्थळी दाखल झाले.

यावेळी पोलिसांना पाहताच खाण माफियांनी त्यांच्यावर दगडफेक करायला सुरुवात केली. तसेच काही जणांनी घटनास्थळावरून पळ काढला. दरम्यान, सुरेंद्रसिंग यांनी रस्त्यात उभं राहून आरोपींना दगडांनी भरलेला ट्रक थांबवण्याचा इशारा दिला. पण आरोपींनी त्यांच्याच अंगावर ट्रक घातला. या धक्कादायक घटनेत सुरेंद्रसिंग यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच नुहचे पोलीस अधीक्षक वरुण सिंघला पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले. आरोपींचा शोध घेतला जात आहे.

# मेंदूतील गाठीपासून महिलेला शस्त्रक्रियेने जीवदान



**साप्ता. अधिकारनामा**

**पुणे :** मेंदूत वाढलेल्या सुमारे १० सेंटिमीटर परिघाच्या गाठीमुळे दैनंदिन जगण्यात अनेक आव्हानांचा सामना करणाऱ्या एका ३५ वर्षीय महिलेला शस्त्रक्रियेतून नवजीवन मिळाले आहे. या महिलेला क्रॅनिओफॅरिन्जिओमा नामक ट्यूमरने अनेक वर्षांपासून ग्रासले होते. मात्र, शस्त्रक्रियेनंतर आता अनेक गुंतागुंतीच्या त्रासांपासून महिलेला दिलासा मिळणार आहे. खराडी परिसरातील मणिपाल रुग्णालयात मेंदूशल्यविशारद डॉ. प्रवीण सुरवशे यांच्या नेतृत्वाखालील संघाने या महिलेवर शस्त्रक्रिया केली. क्रॅनिओफॅरिन्जिओमा या ट्यूमरच्या प्रभावामुळे महिलेच्या मेंदूच्या कार्यावर परिणाम होत होता. त्याचा परिणाम म्हणून गेल्या महिन्याभरापासून तिला प्रचंड तहान लागत होती. लघवी होण्याचे प्रमाणही खूप वाढले होते. नातेवाईकांनी डॉक्टरांना दिलेल्या माहितीप्रमाणे ३५ वर्षे वयापर्यंत महिलेला मासिक पाळीही आली नव्हती. आवश्यक चाचण्या आणि मेंदूचा एमआरआय केला असता मेंदूतील गाठीने पिट्यूटरी गुँड दाबली गेल्याने महिलेला पाळी येत नसल्याचे निदान डॉक्टरांनी केले. ही गाठ कर्करोगाची नाही, मात्र त्या गाठीच्या अस्तित्वामुळे रुग्णाच्या मेंदूला होऊ घातलेली सर्व प्रकारची संभाव्य इजा टाळणे या शस्त्रक्रियेमुळे शक्य झाले आहे.

मेंदूशल्यविशारद डॉ. प्रवीण सुरवशे म्हणाले, क्रॅनिओफॅरिन्जिओमा हा एक दुर्मिळ ट्युमर आहे. तो कर्करोगकारक नाही. मात्र, त्याचा दाब पिट्यूटरी गुँडवर पडल्याने हार्मोन्स स्त्रवणे आणि अन्य शरीर क्रियांवरचे नियंत्रण जाते. हे ट्यूमर अतिशय संथ गतीने वाढतात. त्यामुळे सुरुवातीला त्यांची लक्षणे दिसत नाहीत. त्यातून निदान अवघड होते. क्रॅनिओटोमी शस्त्रक्रियेतून रुग्णाचा जीव वाचवणे शक्य होते. या केसमधील रुग्ण महिलेला गेले सहा महिने तहान लागण्याचे प्रमाण खुप होते. ती दिवसाला २०-२५ लिटर पाणी पीत असे. या महिलेला लहानपणापासूनच हा ट्यूमर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे तिच्या हार्मोन्सचा समतोल विस्कळीत होत होता. त्यातूनच पाळी न येणे आणि इतर लक्षणे दिसत होती असेही डॉ. सुरवशे यांनी स्पष्ट केले.

# संगणक टंकलेखन परीक्षा २५ जुलै ते २३ ऑगस्ट दरम्यान



**साप्ता. अधिकारनामा**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा आणि स्पेशल स्कील इन कम्प्युटर टायपिंग इन्स्ट्रक्टर्स अँड स्टुडन्टस् या दोन्ही परीक्षा २५ जुलै ते २३ ऑगस्ट या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने एकूण २८१ परीक्षा केंद्रांवर होणार आहेत. या परीक्षांची प्रवेशपत्रे परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर संस्था लॉगइनद्वारे ६ जुलैपासून देण्यात आली आहेत. परिषदेच्या आयुक्त शैलजा दराडे यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. संबंधित संगणक टंकलेखन संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परीक्षार्थींची प्रवेशपत्रे http://www.mscepune.in या संकेतस्थळाद्वारे डाऊनलोड करून शिक्का आणि स्वाक्षरीसह संबंधित परीक्षार्थींना वितरित करण्याची व्यवस्था करावी. विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर येताना प्रवेशपत्रासोबत परीक्षा परिषदेने पुरविलेल्या नमुन्यातील स्वयंघोषणापत्र आणणे आवश्यक आहे.

संस्थाचालकांनी प्रवेशपत्र दिल्यापासून परीक्षेपूर्वी (विद्यार्थ्याचा फोटो व ओळखपत्रासह) समक्ष कार्यालयीन वेळेत येऊन प्रवेशपत्रावर सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांची सही आणि शिक्का घ्यावा, तरच संबंधित विद्यार्थ्यास परीक्षेला बसता येईल. सर्व परीक्षार्थ्यांनी त्यांची ऑनलाइन प्रवेशपत्रे आपल्या संगणक टंकलेखन संस्थेतून परीक्षेपूर्वी घ्यावीत. परीक्षा सुरू झाल्यानंतर कोणतीही दुरुस्ती करून दिली जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

# तातडीने सर्वेक्षण करून पूरग्रस्तांना मदत करणार – उपमुख्यमंत्री फडणवीस



**साप्ता. अधिकारनामा**

**चंद्रपूर :** सततच्या पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यात त्यातही चिमूर तालुक्यात झालेले नुकसान खूप मोठे आहे. नागरिकांच्या शेतात तसेच घरातही पाणी शिरल्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले असून पूरग्रस्तांना लवकरात लवकर मदत केली जाईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. चंद्रपूर जिल्ह्यातील नवेगाव (पेठ) येथे नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत चिमूरचे आमदार कीर्तीकुमार ऊर्फ बंटी भांगडिया, माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. चंद्रपूर जिल्ह्यात जवळपास ५५ हजार हेक्टरवर शेतमालाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नदी, नाल्यांना पूर आल्यामुळे पुराचे पाणी शेतात तसेच नागरिकांच्या घरात शिरले. यात घरांची पडझड झाली. पुराच्या पावसामुळे सोयाबीन, कापसाचे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. ज्या घरांची अंशतः किंवा पूर्णतः पडझड झाली, अशा नागरिकांना प्रशासनातर्फे सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. आता पाणी ओसरत असल्याने नागरिक आपापल्या घरी परत जात आहेत. नुकसानग्रस्त नागरिकांना शासनाच्या वतीने त्वरित मदत देण्यात येईल. मदतीपासून कोणीही वंचित राहणार नाही. त्यासाठी तातडीने पंचनामा करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले आहे. अंतिम आकडेवारी आल्यावर जास्तीत जास्त मदत केली जाईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, पोलीस अधीक्षक अरविंद साळवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा गौरकार, चिमूरचे उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे, चिमूरच्या तहसीलदार प्राजक्ता बुरांडे, गटविकास अधिकारी श्रीमती खोचरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ललित पटले, तालुका कृषी अधिकारी ज्ञानदेव टिके यांच्यासह प्रशासनाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

# मुळशी धरण परिसरातील कंपने भूकंपाची नाहीत, कारणे शोधण्यासाठी जीएसआयला सूचना




**साप्ता. अधिकारनामा**

**पुणे :** मुळशी तालुक्यातील लिंबारवाडी आणि वडगाव (वाघवाडी) येथे झालेल्या भूस्खलनाचे नेमके कारण शोधण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेला (जीएसआय) सर्वेक्षण करण्याबाबत कळवले आहे. दरम्यान मुळशी धरण परिसरात नोंद झालेली कंपने भूकंपाची नसून अतिशय कमी तीव्रतेची असल्याची माहिती टाटा पॉवरकडून देण्यात आली. टाटा पॉवरने मुळशी धरण परिसरात भूकंपाच्या धक्क्यांची नोंद झाल्याबाबत प्रथमदर्शनी कळवले होते. तथापि, नोंद झालेली कंपने ही भूकंपाची नसून ४०-४२ किमी परिघामधील विस्फोट, भूस्खलन आदी स्वरुपाच्या आघातजनक घटनांमुळे झाले असल्याचा अंदाज आहे. नोंद झालेली कंपने अतिशय कमी तीव्रतेची (०.२ जी) असल्याचे दिसून आले, असे टाटा पॉवरकडून सांगण्यात आले. त्यामुळे लिंबारवाडी आणि वडगाव (वाघवाडी) येथे झालेल्या भूस्खलनाचे नेमके कारण शोधण्यासाठी या जागेचे सर्वेक्षण करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी पत्राद्वारे जीएसआयला कळवले आहे.

# मराठमोळी निर्माती प्रियंका मोरेचा बंगाली माहितीपट 'घासजोमी' आंतरराष्ट्रीय महोत्सवात!



**साप्ता. अधिकारनामा**

**मुंबई :** प्रियंका मोरे या मराठमोळ्या निर्मातीची 'घासजोमी' फीचर फिल्म यंदाच्या १९व्या स्टुटगार्ड आंतरराष्ट्रीय महोत्सवात येत्या २३ जुलैला दाखवली जाणार आहे. विशेष म्हणजे ही फीचर फिल्म बंगाली भाषेत आहे. प्रियंकाने मास मीडियामध्ये आपले शिक्षण पूर्ण करून न्यूयॉर्क फिल्म ॲकॅडमीतून चित्रपटाचं शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर तिने कान महोत्सवात पुरस्कारप्राप्त जाहिरातीसाठी लाईन प्रोड्यूसर म्हणून काम केलं. प्रियंकाने निर्मिती केलेल्या अनेक शॉर्टफिल्म्सना आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये गौरवण्यात आलं. त्याशिवाय "होली राइट्स" या डॉक्युमेंट्रीला राष्ट्रीय तसेच अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. सुमंत्रा रॉय दिग्दर्शित "घासजोमार" या फिल्ममध्ये अचानकपणे भेटलेल्या दोन महिलांची गोष्ट अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. इंडियन फिल्म फेस्टिव्हल, स्टुटगार्डमध्ये या फिल्मला वर्ल्ड प्रीमियरचा मान मिळाला आहे.

तिच्या या पहिल्याच बंगाली फिल्मच्या निर्मितीविषयी विचारले असता प्रियंका म्हणाली, ' फिल्म मेकींग ही एक कला आहे तिला कुठल्याही भाषेचे बंधन नसतं. खरं म्हणजे, या फिल्मची गोष्ट आणि ती सांगण्याची पद्धत मला खूप भावली म्हणून मी ती करण्याचे ठरवले. माझा बंगाली फिल्म बनवण्याचा निणर्य हा सर्वस्वी स्क्रिप्टची मागणी आणि माझे दिग्दर्शक यांच्यावर अवलंबून होता. माझा हा प्रवास अत्यंत आव्हानात्मक होता, पण मला यातुन खूप काही शिकायला मिळालं. वेगळ्या संस्कृतीच्या कलाकारांना भेटणं, त्यांना समजून घेणं आणि त्यांच्यासोबत काम करण हा एक वेगळाच अनुभव होता.

# दुचाकी घसरून बापलेकीचा मृत्यू, मुलीला शाळेत घेऊन जाताना झाला अपघात




**साप्ता. अधिकारनामा**

**पुणे :** पुणे-सासवड रस्त्यावर मुलीला शाळेत सोडायला जात असताना ट्रकच्या धडकेत बापलेकीचा मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी घडली. मुलीला उपचारासाठी घेऊन जात असताना तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. पुणे सासवड रोडवरील ग्लायडिंग सेंटर जवळून दुचाकीवरून ट्रीपल सीट जाणाऱ्यांनी कचरा फेकला.त्यावेळी मागून येणाऱ्या दुचाकी चालकांचे लक्ष विचलित झाल्याचे सांगण्यात आले. दुचाकी घसरली आणि मागून येणाऱ्या कंटेनरने दुचाकीवरील बापलेकीला चिरडल्याची घटना घडली. मीनाक्षी साळुंखे (वय १०) आणि निलेश साळुंखे (वय ३५) असे अपघातमध्ये मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नीलेश साळुंखे हे मीनाक्षीला आज सकाळी साडे वाजण्याच्या सुमारास हडपसर येथील साधना मुलींच्या शाळेत सोडण्यास दुचाकीवरून नेहमीप्रमाणे जात होते. नीलेश साळुंखे हे ग्लायडिंग सेंटर जवळून दुचाकीवरून जात असतांना त्यांच्या पासुन काही अंतरावर पूढे असलेल्या दुचाकीवरून जाणाऱ्या एकाने कचरा फेकला.

त्यामुळे नीलेश यांचे दुचाकी चालविताना विचलित झाले आणि त्यातून त्यांची दुचाकी गाडी घसरली. त्याच दरम्यान मागून येणाऱ्या कंटेनरने दुचाकीवरील बापलेकीला चिरडले. यामध्ये नीलेश यांचा जागीच मृत्यू झाला तर मुलीला उपचारासाठी दाखल करण्यास जात असताना तिचा मृत्यू झाला. तर या प्रकरणी कंटेनर चालकास ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू असल्याचे हडपसर पोलिसांनी सांगितले.


# आरोग्य विभागाकडून टेलिमेडिसीन सेवेचा विस्तार

**साप्ता. अधिकारनामा**

**मुंबई :** आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम भागातील रुग्णांना मिळण्याच्या दृष्टीने सुमारे दीड दशकापूर्वी आरोग्य विभागाने सुरु केलेल्या टेलिमेडिसीन उपक्रमाचा आता व्यापक विस्तार करण्याचा निणर्य आरोग्य विभागाने घेतला आहे. याचा फायदा ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या प्रमाणात होणार असून आजपर्यंत आरोग्य विभागाच्या या योजनेच्या माध्यमातून २३ लाखाहून अधिक रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. आगामी दोन वर्षात ४० लाख रुग्णांना टेलिमेडिसीन आरोग्य सेवा मिळावी असा आमचा संकल्प असल्याचे आरोग्य विभागाच्या ज्येष्ठ डॉक्टरांनी सांगितले. महाराष्ट्रात सप्टेंबर २००६ साली इस्त्रो च्या मदतीने आरोग्य विभागाने ही टेलिमेडिसीन सेवा सुरु केली होती. पुढे केंद्र सरकारने यात पुढाकार घेऊन देशभरात 'इ संजीवनी' सॉफ्टवेअरच्या माध्यमातून टेलिमेडिसीन योजना राबविण्यास सुरुवात केली. यातूनच देशभरात टेलिमेडिसीनच्या माध्यमातून ५ कोटी चार लाख ८७ हजार ५७ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. या टेलिमेडिसीन सेवेचा सर्वात प्रभावीपणे उपयोग आंध्र प्रदेशने केला असून जवळपास एक कोटीहून जास्त रुग्णांना टेलिमेडिसीन सेवेचा फायदा मिळाला आहे. त्यापाठोपाठ कर्नाटक सुमारे ६३ लाख रुग्ण, पश्चिम बंगाल ५९ लाख ११ हजार रुग्ण, तामिळनाडू ४८ लाख रुग्ण तर उत्तर प्रदेशात २४ लाख २९ हजार रुग्णांवर टेलिमेडिसीन द्वारे उपचार करण्यात आले आहेत. देशात टेलिमेडिसीन सेवेचा वापर करण्यात महाराष्ट्राचा सहावा क्रमांक असून आतापर्यंत २३ लाख ८४ हजार ६६५ रुग्णांवर टेलिमेडिसीन सेवेच्या माध्यमातून उपचार करण्यात आले आहेत.

ग्रामीण, दुर्गम तसेच अतिदुर्गम भागात या सेवेची गरज लक्षात घेऊन गेल्या काही वर्षांपासून आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ प्रदीप व्यास यांनी टेलिमेडिसीन सेवेचा विस्तार कार्यक्रम हाती घेतला आहे. आतापर्यंत राज्यातील १६६१ प्राथमिक आरोग्य केंद्र, ६८६६ आरोग्य उपकेंद्र, ५०२ शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये अशा ७२ ठिकाणी ई-संजीवनी टेलिकन्सल्टेशन व ई-संजीवनी बाह्य रुग्ण चिकित्सा रुग्णांना दिली जाते. यासाठी जिल्हा रुग्णालयांमध्ये 'हब' तयार करण्यात आले असून यात पाच डॉक्टर व तीन विशेषज्ञांच्या माध्यमातून टेलिकन्सल्टेशन सेवा दिली जाते. ई-संजीवनी बाह्य रुग्ण चिकित्सा सेवा (ओपीडी) ही एप्रिल २०२० मध्ये सुरु झाली असून यात रुग्ण थेट डॉक्टरांशी संवाद साधू शकतात. रुग्णाचे प्रश्न समजून घेऊन त्यांना इ प्रिस्क्रिप्शन दिले जाते. या प्रिस्क्रिप्शनच्या आधारे आरोग्य विभागाच्या दवाखान्यात रुग्णांना मोफत औषध दिले जाते.

# आता गुगल मॅपवरही औरंगाबादच्या जागी दिसणार 'संभाजी नगर'




**साप्ता. अधिकारनामा**

**औरंगाबाद :** औरंगाबादचे संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव असे नामकरण करण्याच्या महाविकास आघाडी सरकारच्या निणऱ्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्थगिती दिली होती. या निणऱ्यानंतर विरोधकांकडून शिंदे सरकारवर जोरदार टीका करण्यात आली. मात्र यानंतर झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये नव्या सरकारतर्फे यासंदर्भात मोठा निणऱ्य घेण्यात आला. उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औरंगाबाद शहराचे नामकरण संभाजीनगर असे होणारच, नामांतराला स्थगिती दिली जाणार नाही, असे स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांपासून औरंगाबादच्या नामांतराचा विषय खूपच चर्चेत आहे. नामांतराचा मुद्दा तापलेला असतानाच एक महत्त्वाची गोष्ट घडली आहे. गुगल मॅप्सवर औरंगाबाद शहराचे नाव 'संभाजी नगर' करण्यात आले आहे. इतकेच नाही तर गुगलवरही औरंगाबादचे नाव बदलण्यात आले आहे. आता गुगलवर औरंगाबाद शहर असं टाइप केल्यानंतर तिथे औरंगाबादच्या जागी संभाजीनगर असं लिहून येत आहे.

औरंगाबाद जिल्ह्याचे नाव बदलून संभाजीनगर करण्याच्या प्रस्तावाला राज्य सरकाने मंजुरी दिली असली तरीही एमआयएमने या निर्णयाला विरोध केला आहे. त्यामुळे आता गुगल मॅपवर संभाजीनगर असा उल्लेख आल्याने पुन्हा वादाला तोंड फुटणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# फुप्फुसाच्या कर्करोगाने ग्रासलेल्या ६३ वर्षीय रुग्णाला जीवदान



**साप्ता. अधिकारनामा**

**पुणे :** लष्करी वैद्यकीय सेवेतील एक महत्त्वाची संस्था असलेल्या आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिओ थोरॅसिक सायन्सेस (एआयसीटीएस) मधील श्वसनरोग विभागातर्फे फुप्फुस कर्करोगाने ग्रासलेल्या एका ६३ वर्षीय रुग्णाला जीवदान देण्यात आले आहे. लष्करातून निवृत्त झालेला हा ६३ वर्षीय रुग्ण फुप्फुसातील कर्करोगाच्या गाठीमुळे अनेक तक्रारींचा सामना करत होता. त्यावर उपाय म्हणून इलेक्ट्रो कॅटरी या प्रक्रियेचा वापर करुन रुग्णाचे प्राण वाचवण्यात आले. लष्करी वैद्यकीय सेवेत प्रथमच ही प्रक्रिया यशस्वी करण्यात आल्याचे लष्कराच्या दक्षिण कमांडतर्फे कळवण्यात आले आहे. लष्करातून निवृत्त झालेल्या सदर रुग्णाला अनेक सहव्याधींची पार्श्वभूमी आहे. त्यातच त्याच्या फुप्फुसाच्या डाव्या बाजूच्या मुख्य वायूमार्गाला कर्करोगाने ग्रासल्याचे स्पष्ट झाले. रुग्णाला जनरल ॲनस्थेशिया देऊन ब्रॉंकोस्कोपी करण्यात आली. त्यानंतर फुप्फुसाच्या डाव्या बाजूचा वायूमार्ग मोकळा करण्यात आल्याचे एआयसीटीएसतर्फे सांगण्यात आले.

# कोल्हापूरचे खासदार संजय मंडलिक, धैर्यशील माने अखेर शिंदे गटात



**साप्ता. अधिकारनामा**

**कोल्हापूर :** आडून आडून शिंदे गटासोबत जाण्याचे संकेत देणारे खासदार संजय मंडलिक व खासदार धैर्यशील माने यांनी मंगळवारी उघडपणे एकनाथ शिंदे गटात गटासोबत राहिल्याचे स्पष्ट झाले. आज शिवसेनेच्या खासदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यामध्ये कोल्हापुरातील या दोन्ही खासदारांचा समावेश होता. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेनेत दुफळी निर्माण झाली. शिंदे यांच्या सोबत जिल्ह्यातील राज्यमंत्री, आमदार, माजी आमदार यांनी जाण्याचा निणऱ्य घेतला होता. त्यावेळी जिल्ह्यातील दोन्ही खासदारांची भूमिका तळ्यात होती. खासदार मंडलिक यांनी तर फुटीर शिवसैनिकांना उद्देशून ' गेले ते बेन्टेक्स राहिले ते सोने ' अशा शब्दात निशाणा साधला होता. धैर्यशील माने यांनीही उद्धव ठाकरे यांच्याशी निष्ठा असल्याचे स्पष्ट केले होते.

तथापि गेल्या दोन-तीन दिवसापासून दोन्ही खासदार शिंदे गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा होती. विकास कामांसाठी शिंदे यांच्यासोबत राहणे राजकीयदृष्ट्या फायदेशीर असल्याचे त्यांच्या विधानातून प्रतीत होत होते. आज शिवसेनेच्या बारा खासदारांनी शिंदे यांची भेट घेतली. त्यामध्ये मंडलिक व माने या दोन्ही खासदारांचाही समावेश होता. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेनेला दुसरा जबर दणका बसला असून त्याचे जिल्ह्याच्या राजकारणावर परिणाम होणार असल्याचे दिसत आहे.

# सुट्या डाळी, धान्य, दही, लस्सीवरील जीएसटी मागे

**साप्ता. अधिकारनामा**

**नवी दिल्ली :** आधीच देश महागाईने होरपळ होत असताना केंद्र सरकारने ज्या वस्तूंवर आधी जीएसटी होता, त्यात वाढ केली होती. तर ज्या गोष्टी जीएसटीच्या कक्षेत नव्हत्या त्यांच्यावर जीएसटी आकारायला सुरुवात केली. यावरून संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी गदारोळ माजविला. जनतेमध्येही प्रचंड रोष निर्माण होऊ लागला आहे. अखेर केंद्र सरकारने माघार घेतली असल्याचे ट्विट केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केले आहे. केंद्राने खुल्या धान्यावरील जीएसटी मागे घेऊन दिलासा दिला आहे. केंद्र सरकारने सुट्या धान्यावर देखील पाच टक्के जीएसटी आकारला होता. हा जीएसटी मागे घेत असल्याचे सीतारामन यांनी म्हटले आहे. यानुसार सुट्या डाळी, गहू, राई, ओट्स, मका, तांदूळ, पीठ, रवा, बेसन, मुढी, दही आणि लस्सी यावर पाच टक्के जीएसटी लागणार नाही, अशी घोषणा केंद्र सरकारने केली आहे.

गेल्या महिन्यात झालेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत हा निणऱ्य घेण्यात आला होता. २५ किलो वजनाच्या प्री-पॅकेज केलेल्या आणि लेबल केलेल्या खाद्यपदार्थांवर ५ टक्के जीएसटी लावण्यात आला होता. याची अंमलबजावणी १८ जुलैपासून झाली होती. यामध्ये अनेक वस्तूंचा जीएसटी देखील वाढविण्यात आला आहे. यामुळे अनेक वस्तू, खाद्यपदार्थ महाग झाले आहेत.